सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १० मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## नांदगाव पेठ येथे पाकिस्तानहून धमकीचा कॉल : दिल्लीला बॉम्बस्फोटाची धमकी

### युवकाच्या सतर्कतेमुळे पोलिस यंत्रणा अलर्टवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नांदगाव पेठ**

भारत-पाकिस्तान युद्धसदृश तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील नांदगावपेठ येथे घडलेल्या घटनेने खळबळ उडवली आहे. १० मे रोजी एक धक्कादायक प्रकार समोर आला, जेव्हा डव हेरिटेज गारमेंट कंपनीत काम करणाऱ्या ओडिशातील युवकाला पाकिस्तानहून (+९२ कोड) धमकीचा व्हॉट्सअॅप कॉल आला. कॉल करणाऱ्याने स्वत:ला पाकिस्तानी सैन्यातील अधिकारी असल्याचे सांगून, दिल्लीतील चार ठिकाणी बॉम्बस्फोट घडविण्याची धमकी दिली.या कॉलमुळे प्रचंड घाबरलेल्या युवकाने



तात्काळ नांदगावपेठ पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. संबंधित युवकाचे नाव प्रशांत पंचानन ठाकुर (वय ३०, रा. बलांगी, ओडिशा) असे असून, तो नांदगावपेठ एमआयडीसीतील डव गारमेंट कंपनीत टेलर म्हणून कार्यरत आहे.

सकाळी ११ वाजताच्या सुमारास कामावर असताना प्रशांतला व्हॉट्सअॅपवर आलेल्या कॉलमध्ये समोरच्या व्यक्तीने मी पाकिस्तान आर्मीमधून बोलत आहे, आम्ही दिल्लीतील चार ठिकाणी बॉम्बस्फोट घडवणार आहोत अशी धमकी दिली. घाबरून गेलेल्या प्रशांतने हा कॉल आपल्या मित्राकडे दिला. त्यांनी दोघांनी मिळून त्या व्यक्तीला उलट प्रत्युत्तर दिले आणि कॉल कट केला. मात्र त्यानंतर त्याच क्रमांकावरून सलग चार मिसकॉल आल्याने प्रशांत अधिकच घाबरला.त्याने तात्काळ ११२ वर संपर्क साधला. आपत्कालीन पथक घटनास्थळी दाखल होऊन त्याला पोलिस ठाण्यात घेऊन गेले. पोलिसांनी कॉलचे रेकॉर्डिंग ऐकून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. काही वेळातच डीसीपी सागर पाटील, एसीपी कैलाश पुंडकर, गुन्हे शाखा प्रमुख पीआय बाबाराव अवचार, सीपी स्पेशल स्कॉड प्रमुख पीआय आसाराम चोरमले यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी पोहोचले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अकोला येथील एटीएस, तसेच पोलिस आयुक्तालयातील एटीसी व आयबीच्या अधिकाऱ्यांनीही तपासात सहभाग घेतला. सायबर पोलिसांनी कॉलचा स्त्रोत शोधण्याचे तांत्रिक काम सुरू केले असून, सीपी रेड्डी आणि त्यांच्या टीमने संपूर्ण अहवाल तयार करून तो राज्य गृहमंत्रालय व केंद्रीय गृहमंत्रालयाकडे पाठवला आहे.या प्रकारामुळे अमरावती शहर व परिसरात हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. सर्व पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करून त्यांना तात्काळ ड्युटीवर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, परेलमधील टाटा रुग्णालयाला शुक्रवारी धमकीचा मेल आला होता. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेमध्ये वाढ करण्यात आली होती. टाटा मेमोरियल रुग्णालयाला धमकीचा मेल आल्याने मुंबईत एकच खळबळ उडाली होती. धमकीच्या मेलनंतर पोलिस यंत्रणा सतर्क झाली होती. संपूर्ण रुग्णालयात सर्च ऑपरेशन राबविण्यात आले होते. बॉम्बशोधक पथक टाटा मेमोरियल रुग्णालयात दाखल झाले होते. ज्या मेलवरून ही धमकी आली आहे त्याचा आयपी ड्रेस शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

#### अफवांवर विश्वास ठेवू नका - सिपी रेड्डी

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी नागरिकांना +९२ पासून सुरू होणाऱ्या क्रमांकावरून आलेल्या कॉलला प्रतिसाद देऊ नये,



तसेच सोशल मीडियावर कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे. अफवा पसरवणाऱ्यांविरोधात सायबर सेलमधील विशेष मॉनिटरिंग टीम तात्काळ कारवाई करेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## पाकिस्तानच्या गोळीबारात भारताचे आठ जवान जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०जम्मू**

मागील तीन-चार दिवसांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्कर संघर्ष वाढला आहे. ८ मेपासून पाकिस्तानकडून रात्रीच्या वेळी हवाई हल्ले केले जात आहे. त्याचबरोबर सीमेपलिकडून अंदाधूंद गोळीबारही सुरू आहे. भारताकडून पाकिस्तानच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. दरम्यान, लष्कराने दिलेल्या माहितीनुसार पाकिस्तान सोबत सुरू असलेल्या या लष्करी संघर्षात बीएसएफचे आठ जवान जखमी झाले आहेत. जम्मूमधील आरएस पुरा पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या हल्ल्यात ते जखमी झाले.

पाकिस्तानच्या प्रत्येक हल्ल्याला भारतीय सैन्य जशास तसे उत्तर दिले आहे अशी माहिती कर्नल सोफिया कुरेशी यांनी माध्यमांना दिली. राजस्थानच्या बारमेरमधील पोलिसांनी क्षेपणास्त्राचे अवशेष जप्त केले. जे नंतर पोलिसांच्या वाहनातून नेले जातात.

## ऑपरेशन 'सिंदूर' मध्ये पाच मोठ्या दहशतवाद्यांचा खात्मा; मसूद अजहरच्या नातेवाईकांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०जम्मू**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्याचा बदला म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले आहे. ७ मे रोजीच्या मध्यरात्री भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ला केला. या हल्ल्यात पाच हाय प्रोफाइल दहशतवाद्यांचा खात्मा झाला असल्याची माहिती भारतीय सुरक्षा अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं.

ज्या दहशतवादी स्थळांना लक्ष्य करण्यात आले त्यात बहावलपूर (जैश-ए-मोहम्मद - जेईएमचा बालेकिल्ला) आणि मुरीदके (लष्कर-ए-तैयबा - एलईटीचा तळ) यांचा समावेश होता. या कारवाईत लष्कर-ए-तय्यबा (एलईटी) आणि जैश-ए-मोहम्मद (जेईएम) या दहशतवादी संघटनांमधील प्रमुख व्यक्तींना लक्ष्य करण्यात आले.



लष्कर ए तय्यबा संघटनेचा दहशतवादी मुदस्सर खादियान खास, जैश ए मोहम्मद संघटनेचा हाफिज मुहम्मद जमील, जैश ए मोहम्मद संघटनेचा दहशतवादी मोहम्मद युसूफ अझहर, लष्कर ए तय्यबा संघटनेचा दहशतवादी खालिद, जैश ए मोहम्मद संघटनेचा दहशतवादी मोहम्मद हसन खान या दहशतवाद्यांचा या हल्ल्यात खात्मा झाला.

## भारताची लढाऊ विमानं पाकिस्तानमध्ये घुसली, तीन हवाई तळांवर तुफान हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०जम्मू**

पाकिस्तानकडून शुक्रवारी सलग दुसऱ्या दिवशी पाकिस्तानने भारतावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करण्यात आले. यामध्ये पाकिस्तानच्या बहुचर्चित फतेह-१ या मिसाईलचाही समावेश होता. यानंतर आता भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली आहे. भारतीय वायूदलाची लढाऊ विमाने शनिवारी सकाळी पाकिस्तानमध्ये घुसली आहेत. या विमानांनी पाकिस्तानच्या



तीन ते चार हवाई तळांवर हल्ले केले आहेत.

रावळपिंडीलगतच्या नूर खान हवाई तळाला भारताच्या लढाऊ विमानांनी लक्ष्य केले आहे. याशिवाय, मुरीद आणि सुकूर या हवाई तळांवरही भारतीय हवाईदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवला आहे. या हवाई हल्ल्यात पाकिस्तानचे खूप मोठे नुकसान झाले आहे. भारतीय वायूदलाने पाकिस्तानचे ३ एअरबेस उद्धवस्त केल्याने आता येथून पाकिस्तानच्या लढाऊ विमानांना उड्डाण करता येणार नाही. याचा फटका पाकिस्तानला बसणार आहे.

पाकिस्तानकडून शुक्रवारी रात्री भारताच्या ४ हवाई तळांवर हल्ले केले होते. पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला होता. यामध्ये पाकिस्तानच्या फतेह-१ या क्षेपणास्त्राचाही वापर करण्यात आला. मात्र, भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीमने हे सर्व हल्ले परतवून लावले आहेत. उधमपूर आणि पठाणकोट येथील हवाई हद्दीत पाकिस्तानची फायटर जेटस् शिरली होती. भारताच्या प्रतिहल्ल्यात पठाणकोट येथे पाकिस्तानचे एक लढाऊ विमान पाडण्यात आले आहे. पाकिस्तानने भारताच्या एकूण सहा हवाई तळांना लक्ष्य करण्यात आले. यासाठी पाकने ड्रोनचा वापर केला होता. हरियाणातील सिरसा हवाई तळावरही पाकिस्तानने हल्ला केला होता. मात्र, भारतीय सैन्याने याठिकाणी डागण्यात आलेले क्षेपणास्त्र हवेतच नष्ट केले.

**भारताच्या कोणत्या हवाई तळांवर पाकिस्तानकडून हल्ले?**

जम्मू एअर बेस, उधमपूर एअर बेस , पठाणकोट एअर बेस , श्रीनगर एअर बेस ,बियास एअर बेस

## भारताने गिअर बदलला, आता मिशन DEAD सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० नवी दिल्ली**

भारतावर करण्यात आलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना जशास तसे प्रत्युत्तर मिळाल्यामुळे पाकिस्तानला चांगलाच झटका बसला आहे. भारताकडून आता केवळ पाकिस्तानच्या हल्ल्यांपासून फक्त संरक्षणाची रणनीती न अवलंबता नुकसान होईल, असे मोठे प्रतिहल्ले करण्यास सुरुवात झली आहे. त्यामुळे आता पाकिस्तान नरमताना दिसत आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी यासंर्भात महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. आम्हाला युद्ध नको शांती हवी, असे वक्तव्य इशाक दार यांनी केले आहे.

जर भारताने हल्ले थांबवले तर आम्हीही थांबू. आम्हाला विनाश नको, आम्हाला निधीचा अपव्यय नको. जर त्यांनी थांबवले तर आम्हीही थांबू.पाकिस्तानला नेहमीच शांतता हवी होती. जर भारताने या क्षणी थांबले तर आम्हीही शांततेचा विचार करू आणि बदला घेणार नाही किंवा काहीही करणार नाही.आम्हाला खरोखर शांतता हवी आहे, असे इशाक दार यांनी म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर इशाक दार यांनी भारताविरोध वक्तव्य करुन वातावरण तापवले होते. मात्र, आता त्यांच इशाक दार यांनी, 'आम्हाला आता लढायचं नाही, भारत थांबला तर आम्ही थांबू', अशी भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात गेल्या चार दिवसांपासून हल्ले-प्रतिहल्ले सुरु आहेत. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर तोफांनी, क्षेपणास्त्रांनी आणि ड्रोनने मारा केला जात आहे. भारताने सर्वप्रथम ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्धवस्त केले होते. त्यानंतर आता भारत टप्प्याटप्प्याने ही मोहीम पुढे नेत आहे. दुसऱ्या टप्प्यात पाकिस्तानने भारतावर हल्ला केला सैन्याने तेव्हा पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्रं नष्ट करुन भारताने या हल्ल्याला सरप्रेस केले. त्यानंतरही शुक्रवारीही पाकिस्तानने पुन्हा हल्ला केला तेव्हा भारतीय सैन्याने फक्त 'सप्रेशन' स्ट्रॅटेजी न वापरता काऊंटर अटॅक केला. भारतीय सैन्याचे पहिले धोरण (सप्रेशन ऑफ एनिमी एअर डिफेन्स) म्हणजे सीड असे होते. आता भारताने डिस्ट्रक्शन ऑफ एनिमी एअर डिफेन्स धोरण वापरायला सुरुवात केली आहे. त्यामुळेच पाकिस्तानच्या कालच्या हल्ल्यानंतर भारताने प्रतिहल्ला करुन पाकिस्तानी सैन्याचे हवाई तळ उद्धवस्त केले आहेत.

### पाकिस्तान म्हणतं, आता आम्हाला शांती हवी




## बेगानी शादी में माझा अब्दुल्ला दीवाना का करता?- दोन्ही राष्ट्रवादी एकत्रीकरणावर फडणवीसांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०पिंपरी (आळंदी)**

देशाच्या सीमांवर भारत-पाकिस्तान धुमश्चक्री सुरु असताना, आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या एका वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. शरद पवार यांच्या वक्तव्याचे अनेक अर्थ काढले जात आहेत. एकीकडे दोन ठाकरे बंधू म्हणजे उद्धव आणि राज ठाकरे महाराष्ट्राच्या राजकारणात आणि महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याची चर्चा सुरू आहे. दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का, यावर चर्चेचं गुऱ्हाळ सुरु झालं आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यम प्रतिनिधींनी बोलतं करण्याचा प्रयत्न केला.

माऊलींचं दर्शन घेऊन समाधान वाटतंय. आपल्या संतांचे विचार या समाजात रुजायला हवे अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माऊलींचं दर्शन घेतल्यानंतर दिली. त्याचबरोबर




पाकिस्तान भारतावर करत असलेल्या हल्ल्याविषयी आम्ही योग्य खबरदारी घेतली आहे. प्रत्येक जिल्ह्यात आमचे वॉर रूम तयार आहेत आणि प्रत्येक जिल्ह्याला आम्ही योग्य ती मदत करत आहोत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

तर संत ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी सांप्रदायाचा पाया रचला आहे. याच संतानी दिलेला विचार आचरणात आणणे काळाची गरज आहे. त्यामुळंच मी स्वतः येथे येऊन या विचारानेच जाण्याचा प्रयत्न करत आहे. तर पाकिस्तान नेहमी दहशतवादी कृत्यांना समर्थन करत आलेलं आहे. परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठोस भूमिका घेत या दहशतवादी कृत्यांना सडेतोड उत्तर देण्याचं काम केलं आहे. असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येतील का? यावर तुम्ही सुप्रियाताई किंवा अजित पवारांना विचारा, यात बेगानी शादी में माझा अब्दुल्ला दीवाना का करता? असा उलट प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना विचारला.

## यापुढे कुठलाही दहशतवादी हल्ला हा देशाविरोधातील युद्ध मानलं जाणार, केंद्र सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

गेल्या काही वर्षांपासून सातत्याने होत असलेल्या दहशतवादी कारवाया हे आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी गंभीर आव्हान ठरले आहे. हल्लीच २२ एप्रिल २०२५ रोजी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू काश्मीरमधील पुलवामा येथे हल्ला करून २६ पर्यटकांची हत्या केली होती. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच दोन्ही देशांकडून एकमेकांवर विविध हत्यारांद्वारे हल्ले केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

यापुढे भारताच्या भूमीवरही कुठलाही दहशतवादी हल्ला हे भारताविरोधातील युद्धाची कारवाई मानली जाईल, तसेच त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर दिले जाईल, अशी माहिती केंद्र सरकारमधील वरिष्ठ सुत्रांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# हम सब एक हैं!

निष्पाप लोकांची ज्यांनी हत्या केली, त्यांच्यावरच हल्ला केला आणि 'ऑपरेशन सिंदूर'मागील नैतिक कारण अधोरेखित केले, असे उद्गार संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काढले आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात निष्पाप पर्यटकांची हत्या करण्यात आली होती. हल्ल्याच्या सूत्रधारांना धडा शिकवल्याबद्दल संपूर्ण देशात समाधानाची भावना आहे. भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' अचूकतेने, सतर्कतेने आणि संवेदनशीलतेने पार पाडले. हनुमानाने अशोक वाटिकेला आग लावताना जे केले, तेच आम्हीही केले. म्हणजे निरपराध लोकांना त्रास होऊ नये याची दक्षता घेतली, असे सार्थ प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी केले. कोणत्याही देशाला आपल्या भूमीवर झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याचा अधिकार असतोच.

दहशतवाद्यांचे मनोधैर्य नष्ट करण्याच्या उद्देशानेच त्यांच्या छावण्या व पायाभूत सुविधांवर कारवाई करण्यात आली. मात्र यामुळे पाकिस्तानचे डोके लगेच ठिकाणावर येईल, अशी अजिबात अपेक्षा नाही. त्यामुळे जम्मू व काश्मीरमधील नियंत्रण रेषेवरील गावांना लक्ष्य करून, पाकिस्तानी सैन्याने तोफगोळ्यांचा मारा केला. त्यात चार मुले आणि एका सैनिकासह किमान १३ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ५७ जण जखमी झाले. गोळीबार आणि तोफगोळ्यांच्या मार्यात घरे, वाहने आणि गुरुद्वारासह अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्यामुळे शेकडो नागरिकांना बंकरमध्ये आश्रय घ्यावा लागला. हल्ला करताना पाकिस्तानने सामान्य माणसांच्या जीवांची पर्वाही केली नाही. अर्थात पाकिस्तानच्या या कुरघोडीला भारतीय सैन्याने चोख उत्तर दिले. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी, भारताने हवाई हल्ला केल्यास शत्रूची विमाने उडवून टाकून समुद्रात फेकून देऊ, असे फुत्कार सोडले आहेत. त्याचवेळी त्यांचे संरक्षण मंत्री ख्वाजा असिफ मात्र दोन्ही देशांतील तणाव कमी केला पाहिजे, असे म्हणत आहेत! वास्तविक भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तान भयभीत झाला आहे.

भारताने आमच्या धरणांना लक्ष्य केल्याचा, तसेच निष्पापांचा बळी घेतल्याचा कांगावा पाकिस्तानकडून केला जात आहे. भारताच्या हल्ल्यात २६ पाक नागरिकांचा मृत्यू झाल्याचा आरोप पाकिस्तानने केला असून त्याचा कोणताही पुरावा दिलेला नाही. तसेच पहलगाम प्रकरणाची चौकशी एखाद्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत करण्याचा प्रस्ताव आम्ही दिला; पण भारताने त्यास प्रतिसाद दिला नाही, असे शरीफ वारंवार सांगत आहेत. मुळात पहलगाम कांडाशी काहीही संबध नाही, असा खोटा दावा पाक करत आहे. मग तेथे आलेले दहशतवादी आकाशातून टपकले का? यापूर्वीच्या कोणत्याही दहशतवादी हल्ल्यांची जबाबदारी पाकिस्तानने स्वीकारलेली नाही. पाच वर्षांपूर्वी कुख्यात डॉन दाऊद इब-ाहिम कराचीत असल्याची कबुली पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली होती. पण त्यानंतर अवघ्या २४ तासांत पाकने या वक्तव्यावरून घूमजावही केले होते.

खरे तर, पाकच्या परराष्ट्र खात्याने विविध नावांनी बनवलेले दाऊदचे अनेक पासपोर्ट आणि नॅशनल आयडेंटिटी नंबरही जाहीर केला होता. मुंबईवरील हल्ल्यात असलेला कसाब भारताच्या तावडीत सापडला, तेव्हा तो आमच्या देशाचा नागरिकच नाही, असे पाकिस्तानने जाहीर केले. पण 'जिओ टीव्ही'ने कसाब हा पाकमधील फरीदकोटचा असल्याचे उघड केल्यानंतर पाक सरकारनेही कसाब पाकिस्तानी असल्याचे मान्य केले. मुंबईवरील हल्ल्यानंतर सरकारी वकील उज्ज्वल निकम आणि भारत सरकारचे चार अधिकारी पाकिस्तानला गेले होते. या हल्ल्याचा सूत्रधार हाफिझ सईदविरोधात खटला सुरू करा, अशी विनंती त्यांनी केली. त्यावर, आमच्याकडे पुरावे नाहीत, भारताने पुरावे द्यावेत, असा पवित्रा पाकने घेतला. तेव्हा कट पाकच्या भूमीत रचला गेल्यामुळे पुरावे तुम्ही शोधा, असे भारताने सुनावल्यावर पाकिस्तानी अधिकार्यांनी मौन बाळगले होते. मुंबईवरील हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड हेडलीने दिलेल्या साक्षीत लष्कर-ए तोयबा, पाकिस्तानी लष्कर व आयएसआयचे कसे जवळचे संबंध आहेत, याची माहिती त्याने दिली होती.पण कितीही पुरावे दिले तरीही दहशतवादाबाबत पाकिस्तान कानावर हात ठेवत आला आहे. त्यामुळे पकिस्तानकडून शहाणपणा व समजूतदारपणाची अपेक्षा करण्यात अर्थ नाही. या पार्श्वभूमीवर भारताने आधुनिक विमाने, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून, 'ऑपरेशन सिंदूर' फत्ते केले. पाकिस्तानी हवाई दलाच्या रडारवर उमटण्यापूर्वीच या क्षेपणास्त्राने दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकमध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) तीन किलोमीटर आत घुसून कारवाई केली होती. पुलवामानंतर बालाकोटमध्ये जो हवाई हल्ला भारताने केला, त्यावेळी नियंत्रण रेषेच्या पलीकडे ६० किलोमीटर शिरून लक्ष्यभेद करण्यात आला. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये तर सीमेपलीकडे १५० किलोमीटरवर असलेल्या बहावलपूरपर्यंत घुसून कारवाई केली. खास करून, मुरिदके, बहावलपूर आणि कोटली येथील दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करण्यास विशेष महत्त्व आहे.कारण कारगिल युद्धाच्या काळात काश्मीरमध्ये करण्यात आलेल्या आत्मघातकी हल्ल्यापासून ते मुंबई हल्ल्यापर्यंतच्या सर्व कृत्यांची तेथून आखणी करण्यात आली होती. २०० एकरांत वसलेले मुरिदके हे हाफिझ सईदच्या जमात उद दावाचे मुख्यालय आहे; तर बहावलपूरमध्ये जैश ए मोहम्मदचे मुख्य केंद्र असून, मसूद अझरने तेथूनच सर्व कारवाया केल्या. पाकव्याप्त काश्मीरमधील कोटली हे हिजबुल मुजाहिद्दीनचे मुख्य केंद्र आहे. हिजबुलचा म्होरक्या सय्यद सलाउद्दीनने १९९०च्या दशकात तेथूनच काश्मिरी तरुणांना दहशतवादाचे प्रशिक्षण देऊन, हिंसक कृत्ये करण्यासाठी परत भारतात पाठवले. सीमेपलीकडून होणार्या दहशतवादी हल्ल्यांमागे पाकिस्तानचा हात असल्याचे अनेक ठोस दस्तावेज देऊनही पाकने कधीच कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे भारताच्या या मोहिमेला जगातील प्रमुख देशांनी विरोध न करता केवळ संयमाचे आवाहन केले आहे! 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत केलेल्या निर्णायक कारवाईचे काँग्रेससह देशातील सर्व विरोधी पक्षांनीही कौतुक केले आहे. पाकिस्तानच्या विरोधात 'हम सब एक हैं' अशीच सर्वपक्षीय भूमिका असल्यामुळे पाकिस्तानलाच आता नमते घ्यावे लागणार आहे. अन्यथा त्याला पुन्हा एक दणका द्यावा लागेल!

# कपाशी बीटी वाणांच्या अन्नद्रव्यांची गरज संकरित वाणांपेक्षा कितीपट असते?

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक** कपाशीच्या बीटी वाणांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन काळजीपूर्वक करणे हे या वाणांपासून जास्त उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. बीटी वाणांची अन्नद्रव्यांची गरज नेहमीच्या संकरित वाणांसाठीच्या अन्नद्रव्यांच्या शिफारसीच्या साधारणपणे सव्वापट असल्याने त्यांच्यासाठी खताच्या मात्राही सव्वापट वापरावयास हरकत नाही. मात्र खतांचा वापर (षर्शीांळश्रळूशी) करण्यापूर्वी जमिनीचे माती परीक्षण करून घेणे गरजेचे आहे.




बागायती संकरित कापसासाठी (इरसरूींळ घरीिी) लागवडीच्यावेळी प्रति हेक्टरी २० किलो नत्र (४३ किलो युरिया), ५० किलो स्फुरद (३१३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५० किलो पालाश (८६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. लागवडीनंतर तीस दिवसांनी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) व पुन्हा लागवडीनंतर ६० दिवसांनी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) प्रति हेक्टरी द्यावे.

कोरडवाहू देशी वाणांसाठी लागवडीच्यावेळी प्रति हेक्टरी १२.५ किलो नत्र (२७ किलो युरिया), ५० किलो स्फुरद (३१३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि २५ किलो पालाश (४३ किलो म्यूरेट फ पोटॅश) द्यावे. लागवडीनंतर ३० दिवसांनी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५४ किलो युरिया) द्यावा. बोंडे वाढीच्या काळात २ टक्के (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम) युरियाची पिकावर फवारणी करावी.

कोरडवाहू संकरित वाणांसाठी लागवडीच्या वेळी प्रति हेक्टरी २० किलो नत्र (४३ किलो युरिया), लागवडीनंतर ३० दिवसांनी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) द्यावा. बोंडे वाढीच्या काळात २ टक्के (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम) युरियाची पिकावर फवारणी करावी.

# नैऋत्य मान्सून १३ मे पर्यंत अंदमानात पोहचणार?

## पण महाराष्ट्रापर्यंतचा प्रवास परिस्थितीवर अवलंबून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती** नैऋत्य मान्सून, म्हणजेच भारतीय मान्सून म्हणजेच यंदाचा पावसाळा भारतीय महासागरांच्या सीमेवर लवकर दाखल होईल, असा अंदाज आहे. प्रशांत महासागरातून सुरू झालेला मान्सून मलेशिया, सिंगापुर, सुमात्रा बेटाचा उत्तरेकडील भाग ओलांडून १३ मे पर्यंत म्हणजे येत्या पाच दिवसात भारताच्या अंदमान व निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील आग्नेय बंगालच्या उपसागरात दाखल होईल, अशी शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी माणिकराव खुळे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, सध्या ला-निनो व अल-निनो न्यूट्रल म्हणजे तटस्थ स्थितीत आहेत. शिवाय भारतीय महासागरीय द्विध्रुविता (आयओडी) हा सुद्धा तटस्थ स्थितीत आहे. या दोन्ही घटकांचा मान्सूनच्या प्रवासाशी संबंध जोडता येणार नाही. मार्गातील नैसर्गिक परिस्थितीवर त्याचा वेग व वाटचाल अवलंबून आहे. मात्र तो अंदमानात वेळेपूर्वी दाखल होईल, ही शक्यता सध्याच्या परिस्थितीतून दिसून येत असल्याचे खुळे यांनी स्पष्ट केले. वाढलेल्या तापमानामुळे बहुतेक सागरी भागात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने मान्सूनला गती मिळाली, असे काहींचे मत आहे. दरम्यान तो अंदमानात आला म्हणजे तो लवकरच केरळात आणि तिथून निर्धारीत १० जून पर्यंत महाराष्ट्रात पोहचेल, असा अंदाज बांधता येणार नाही, हेही माणिकराव खुळे यांनी स्पष्ट केले. बरेचदा अंदमानात पोहचला किंवा तिथून तो केरळपर्यंत पोहचला, तरी तेथील नैसर्गिक परिस्थितीमुळे तो बरेच दिवस तेथे रेंगाळत असतो. गेल्या वर्षी अशीच स्थिती होती. निर्धारीत १ जून किंवा त्यापूर्वी अंदमानातून केरळपर्यंत पोहचल्यानंतरही तो कर्नाटक मार्गे महाराष्ट्रात वेळेत पोहचेल की उशीरा, याबाबत ३१ मे पर्यंत स्पष्ट होईल, असे खुळे यांनी सांगितले.



नागपूरसह विदर्भात केरळकडून येणार्या नैऋत्य मोसमी वार्यामुळे नाही, तर बंगालच्या खाडीकडून येणार्या वार्यामुळे पाऊस येतो. विदर्भात मान्सून पोहचण्यासाठी १६ जून ही तारीख निर्धारीत मानली जाते. मात्र गेल्या वर्षी २२ जूनला मान्सूनचा पाऊस पडला होता, पण त्यानंतरही जैलपर्यंत हुलकावणी दिली होती. त्यामुळे यावेळी काय होईल, हे त्यावेळच्या नैसर्गिक स्थितीवर अवलंबून असेल.




# चिया बियांचे असे आहेत चमत्कारी फायदे

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या आरोग्यसाक्षरता वाढल्यामुळे जीवनशैलीत अनेक बदल झाले आहेत. शरीरसंपत्ती वाढवणे, मानसिक शांतता राखणे आणि विविध रोगांपासून संरक्षण करणे यासाठी अन्नघटकांचे योग्य प्रमाण आणि गुणवत्ता महत्त्वाची ठरते. अशाच पोषणदृष्ट्या समृद्ध घटकांमध्ये चिया बिया या अलीकडे विशेष लोकप्रिय झाल्या आहेत.

आज विज्ञानानेही सिद्ध केले आहे की, ही चिया बी केवळ उर्जादायक नाही, तर अनेक आजारांपासून संरक्षण करणाऱ्या 'सुपरफूड' पैकी एक आहे. त्याचे आरोग्यदायी काय आहेत फायदे ते जाणून घ्या सविस्तर

**ऊर्जा वाढवणारे नैसर्गिक टॉनिक**

चिया बियांमध्ये प्रथिने, चांगले चरबीयुक्त आम्ल (ओमेगा-३), फायबर आणि आवश्यक खनिजांनी युक्त आहेत. यामुळे याचे सेवन केल्यावर दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटते आणि व्यायामासाठी आवश्यक ऊर्जा प्रदान होते. काहींच्या मते, चियाचा एक चमचा घेतल्यास २४ तास काम करण्यासाठी पुरेशी ऊर्जा मिळू शकते.

**हृदयासाठी वरदान**

चियामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स रक्तातील कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवतात, रक्तदाब कमी करतात आणि सूज नियंत्रणात ठेवतात. या सर्व घटकांचा एकत्रित प्रभाव हृदयविकाराचा धोका कमी करतो. त्यामुळे कार्डिओव्हास्कुलर आरोग्यासाठी हे बियाणे अत्यंत फायदेशीर आहेत.

**अँटी-एजिंग आणि त्वचेसाठी उपयुक्त**




चिया बियांमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स असतात, जे त्वचेच्या पेशींना फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण देतात. त्यामुळे सुरकुत्या उशिरा येतात, त्वचेचा नूर टिकतो आणि अकाली वृद्धत्वाला थांबवता येते.

**मधुमेह आणि रक्तातील साखर नियंत्रण**

चिया बियांमध्ये विरघळणारे आणि न विरघळणारे फायबरचे उच्च प्रमाण असते. हे फायबर रक्तातील साखरेचे पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी मदत करते. यामुळे टाइप-२ मधुमेहाच्या रुग्णांना विशेष फायदा होतो.

**पाचन आरोग्य आणि डिटॉक्स**

चिया पाण्यात भिजवले असता जिलेटीनस जेली तयार करते. ही रचना आतड्यांत प्रीबायोटिक म्हणून काम करते, जी चांगल्या जीवाणूंच्या वाढीस मदत करते. फायबरच्या भरपूर प्रमाणामुळे पचनक्रिया सुधारते, जळजळ कमी होते आणि विषारी द्रव्ये शरीराबाहेर टाकली जातात.

**वजन नियंत्रणासाठी महत्त्वाचे घटक**

चिया बिया पाण्याचे शोषण करून पोटात फुगतात आणि पोट भरल्यासारखे वाटते. त्यामुळे भूक कमी होते आणि जेवणात अतिसेवन टाळले जाते. वजन कमी करण्यासाठी इच्छुकांसाठी हे एक नैसर्गिक उपाय ठरतो.

**संधिवात व वेदनांवर आराम**

चियातील ओमेगा-३ चरबीमुळे सांधेदुखी आणि सूज कमी होण्यास मदत होते. विशेषतः संधिवात असलेल्या रुग्णांनी याचे नियमित सेवन केल्यास दीर्घकालीन आराम मिळतो,

**मेंदूचा विकास आणि स्मरणशक्तीस मदत**

एझ- आणि उक्क- हे दोन अत्यावश्यक फॅटी ॲसिड्स चियामध्ये आढळतात. हे मेंदूतील न्यूरॉन पेशींच्या कार्यक्षमतेस मदत करतात. यामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते.

**कर्करोगापासून संरक्षणाची शक्यता**

प्राण्यांवर झालेल्या प्रयोगांमधून असे दिसून आले आहे की, चिया बिया काही प्रकारच्या कर्करोगास प्रतिबंध करण्याची क्षमता ठेवतात. तरीही या बाबतीत अजून अधिक मानवी संशोधनाची गरज आहे.

**विटामिन बीमुळे केसांचे आरोग्य सुधारते**

चियामध्ये उपस्थित विटामिन बी केसांच्या वाढीस चालना देतो. त्यामुळे केस अधिक दाट, मजबूत आणि निरोगी राहतात.

**चिया बियांचे औद्योगिक व आहारातील उपयोग**

चियामधील डिंक व म्युसिलेज गुणधर्मांमुळे अन्न उद्योगात त्याचा वापर वाढत आहे. ब्रेड, पास्ता, बिस्किटे, केक अशा बेकरी उत्पादनांत त्याचा समावेश केला जातो.

चिया जेल अंड्याला पर्याय म्हणून वापरले जाते, विशेषतः शाकाहारी (व्हेगन) लोकांसाठी उपयुक्त आहे.

सीएफटीआरआयसारख्या संस्थांनी चिया-मिश्रित आईस्क्रीम, जॅम, चॉकलेट सारखी उत्पादने विकसित केली आहेत.

चिया तेल ही ओमेगा-३ ची सुलभ, स्वस्त आणि सुरक्षित पर्याय आहे. जो सूर्यफूल, मोहरी, ऑलिव्ह तेलांपेक्षा अधिक फायदेशीर आहे.

**आरोग्य आणि पोषण असलेले 'चिया'**

आजच्या घडीला अनेक आजारांचे मूळ हे अयोग्य आहारात आहे. चिया बियाण्यांचे नियमित सेवन केल्यास मधुमेह, हृदयविकार, पचनाचे विकार, लठ्ठपणा यांसारख्या आजारांपासून नैसर्गिक बचाव मिळतो.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात चिया पिकाची यशस्वी लागवड झाल्यामुळे केवळ आरोग्य सुधारण्यापुरतेच नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, कृषी विकास आणि निर्यातीसाठीही मोठी संधी उपलब्ध होताना दिसत आहे.

# पटवारी कॉलनीत अवैध सावकारावर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१०अमरावती-** स्थानिकजुना बायपास मार्गावरील पटवारी कॉलनी येथे एका अवैध सावकाराकडे सहकार विभागाचे पथकाने धाड घालून पडताळणी केली.जिल्हा उपनिबंधक कार्यालयात अवैध सावकारी संदर्भात तक्रार प्राप्त झालेली होती. या तक्रारीचे अनुषंगाने कार्यवाही करणेकरीता जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी तत्काळ धाड पथकाची नेमणुक करुन राजापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहीव ासी रंजना नितीन लव्हाळे (रा. पटवारी कॉलनी, जुना बायपास रोड, अमरावती) यांचे घरी धाड व झडतीची कार्यवाही केली.

पथक क्रमांक एकमध्ये पथक प्रमुख आशिष चर्जन (सहायक निबंधक सहकारीसंस्था वरुड), नंदकिशोर जवंजाळ, उषा मून, सचिन अढावू, पंच मनोज राऊत व अक्षय भुयार, पोलीस संजय वानखडे व ज्योती अरुळकर यांचा समावेश होता. पथकाने रंजना नितीन लव्हाळे यांच्याकडे घरझडतीची कार्यवाही सकाळी १०.१० वाजता सुरु केली. ही प्रक्रिया दुपारी १२.४५ वाजेपर्यंत चालली.

जप्त केलेल्या कागदपत्रांची पडताळणी शंकर कुंभार व सहायक निबंधक स्वाती गुडघे यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार आशिष चर्जन, चौकशी अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था वरुड हे करतील, असे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगीतले आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक


शनिवार दि. १० मे २०२५ शहर/ग्रामिण


## भारत-पाकिस्तान तणावादरम्यान 'फेक न्यूज'चा सुळसुळाट!

### तक्रारीसाठी सरकारने शेअर केला व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक आणि ईमेल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० मुंबई –** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढल्याच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांकडून मोठ्या प्रमाणात खोट्या बातम्या परसरवल्या जात आहेत. इतकेच नाही तर भारत आणि पाकिस्तान यांच्याकडून होणाऱ्या हल्ल्यांसंबधीचे बनावट व्हिडीओ आणि फोटो शेअर करत चुकीचे दावे केले जात आहेत. या संपूर्ण प्रकार रोखण्यासाठी आणि खोटी माहिती पसरू नये या पार्श्वभूमीवर सरकारकडून काही उपाय योजना केल्या जात आहेत. याचाच भाग म्हणून सरकारने नागरिकांना फेक न्यूज बद्दल जागृत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.तुम्हाला सोशल मीडियावर एकाखी चुकीची माहिती देणारी बातमी




किंवा फोटो, व्हिडीओ आढळून आल्यास याबद्दल आता तक्रार करत येणार आहे. राज्य सरकारडून अशा 'फेक न्यूज'बद्दल तक्रार करण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक आणि इमेल आयडी देण्यात आला आहे.

तसेच दोन्ही देशांमधील तणावाच्या काळात एखादी माहिती शेअर करण्यापूर्वी सामान्य नागरिकांनी कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी आणि कोणत्या गोष्टी टाळाव्या याबद्दल देखील सरकारने माहिती दिली आहे.

#### हे करू नका

**सैन्य दलांच्या हालचाली विषयीची माहिती सामायिक करू नका.**

**पडताळून पाहिली नसलेली माहिती कोणालाही पुढे पाठवू नका.**

**हिंसा अथवा सामाजिक तणाव निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरू शकतील अशा पोस्ट टाळा.**

## राज्यात अमरावती सह या भागात पुढील तीन दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस दणका देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१०अमरावती –** हवामान विभागाने पुढील ३ दिवस विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला.

उत्तर महाराष्ट्र, कोकण ते अरबी समुद्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. गेल्या दोन दिवसांत मुंबईत वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, त्यामुळे पश्चिम रेल्वे दोन वेळा बंद पडली. या पावसामुळे मुंबईच्या किमान तापमानाचा पारा उतरला आहे.रात्री गार वारे वाहत असून, दिवसाही मळभ असल्याने उन्हाचे चटके कमी झाले आहेत. गुरुवारीही सकाळपासून मुंबईवर पावसाचे ढग जमा झाले होते. पश्चिम उपनगरात दुपारपर्यंत ठिकठिकाणी




पावसाने हजेरी लावली. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि अहिल्यानगर तसेच नाशिक जिल्ह्यातही पावसाला पोषक हवामान आहे.

राज्यभरातील अवकाळी पावसाचा जोरही पुढील तीन दिवस कायम राहणार आहे. ठिकठिकाणी पडलेल्या पावसामुळे राज्यभरातील किमान तापमानाचा पाराही घसरला आहे.पुढील ३ दिवस काही ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, धाराशिव, नांदेड आणि लातूर जिल्ह्यातही पुढील ४ दिवस काही ठिकाणी वादळी पावसाचा इशारा देण्यात आला.

## दर्यापूर मध्ये ज्वेलर्सचे दुकान फोडले

### ४० किलो चांदी ७०० ग्राम सोने, पाच लाख रोख लंपास




### पाच वर्षातील सर्वात मोठी धाडसी चोरी

### एक कोटीचे दागिने व रोख लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०दर्यापूर**

गेल्या पाच वर्षात झाली नसे एवढी मोठी चोरी शनिवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास दर्यापूर शहरात झाली आहे. दर्यापूर मेन रोडवर कार्यरत असलेले विक्रम ज्वेलर्सचे दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडले असून, सोने चांदीसह रोख रक्कम असा जवळपास एक कोटीच्या आसपास मुद्देमाल लंपास करण्यात चोरटे यशस्वी झाले. तोंडाला कपडे बांधल्याने आणिसीसीटीव्हीचे फुटेज नुकसान केल्याने चोरट्यांनी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे. दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन फिगरप्रिट तज्ञांना प्राचारण केले. ३० ते४० किलो चांदी ७०० ग्राम सोने नेकलेस व पाच लाख रोख रक्कम असा जवळपास एक कोटी रुपयाा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला असल्याची माहिती विक्रमज्वेलर्सचे संचालकलोणकर यांनी दिली. या घटनेचा तपास पोलिस युध्दपातळीवर करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट दिली आहे.

## सोनोने परिवाराने नवरीची घोड्यावरून वरात काढत दिला 'बेटी सन्मान'चा संदेश

### यशोदानगर मध्ये नवरीने हातात राष्ट्रध्वज घेऊन वाजत-गाजत घोड्यावरून निघाली वरात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती**

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देऊन भारताने पाकिस्तानचे नापक मनसुबे उधळून लावणाऱ्या लेफ्टनंट कर्नल सोफिया कुरेशी विंग कमांडर योमिका सिंग या दोन्ही विरांगणांचे देशात कौतुक होत आहे अशातच आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या यशोदा नगर नंबर एक येथील भास्करराव सोनवणे या आदर्श शिक्षकांच्या कुटुंबातील नवरीने हातात राष्ट्रध्वज घेऊन शुक्रवार(ता.९) रोजी घोड्यावर बसून मोठ्या दिमाखात वाजत गाजत वरात काढण्यात आली. देश सन्मानासह स्त्री पुरुष



समानता तसेच बेटी सन्मान चा वरातीतून सोनवणे कुटुंबांनी संदेश दिला आहे. विवाह सोहळा भव्यदिव्य करण्याचा प्रत्येकाचे स्वप्न असते. तसेच विवाह सोहळा जरा हटके व आठवणीत कसा राहिल, यासाठी विविध शक्कल लढवली जाते. विवाह म्हटले की वरात आलीच. पण ही वरात नवरदेवाची असते. सहसा नवरीची वरात काढण्यात येत नाही. पण याला अमरावती शहरातील यशोदा नगर नंबर एक अपवाद ठरले आहे. यशोदा नंबर एक मध्ये नवरीची वाजत-गाजत घोड्यावरून वरात काढण्यात आली. यामधून स्त्री-पुरूष समानता, बेटी बचाव बेटी पढव'चा संदेश देण्यात आला. त्यामुळे या विवाहाची चर्चा सगळीकडे होत आहे.शहरातील यशोदा नगर नंबर एक नगरातील आदर्श शिक्षक भास्करराव सोनोने यांच्या कुटंबातील नवरीची घोड्यावरून मिरवणूक काढली. शहरातील प्रमुख रस्त्यावरून मिरवणूक काढून मुलगा-मुलगी समान, असा संदेश यावेळी देण्यात आला. त्यामुळे सोनोने कुटुंबाचे कौतुक होत आहे. तसेच 'बेटी बचाव बेटी पढाव' या अभियानाला चालना मिळाली आहे.

#### थोरल्या बहिणीचीही काढली होती घोड्यावरून वरात

सिद्धार्थ सोनोने यांची थोरली मुलगी शितल हिचा विवाह २ फेब्रुवारी २०१८ मध्ये पार पडला त्यावेळी १ फेब्रुवारी २०१८ रोजी वधूची थोरली बहीण शीतल हिचीही वरात घोड्यावरून वाजत गाजत काढण्यात आली होती.

#### आदर्श शिक्षकाच्या कुटुंबातील नवरी

शहरातील यशोदा नगर नंबर एक या नगरात सिद्धार्थ सोनोने कुटुंब राहतात. त्यांचे वडील भास्करराव सोनोने हे शिक्षक होते . त्यांना महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांची नात व न्यायालयात लिपिक म्हणून सेवानिवृत्त झालेले सिद्धार्थ सोनोने यांची धाकटी मुलगी कोमल हिचा विवाह चि.क्रांती मनोहर यांच्याशी शनिवार (ता.१०) रोजी सायंकाळी ७.४५ वाजता द मिरा लौन, राजपूत धाब्याच्यामागे, रजनी मंगल कार्यालयासमोर, वलगाव रोड येथे आयोजित केला आहे. या लग्नाच्या पुर्वसंध्येला शुक्रवारी सायंकाळी वधू कोमल सिद्धार्थ सोनोने ची वरात वाजत गाजत काढण्यात आली.परिवाराने दुसऱ्यांदा काढली आहे.

#### काका राजेश सोनोने यांची संकल्पना

वधूचे वडील सिद्धार्थ भास्करराव सोनोनेयांना केवळ दोनच मुली आहेत. कोमल ही त्यांची धाकटी मुलगी आहे. यापूर्वी थोरल्या मुलीचीही त्यांनी अशाच प्रकारे घोड्यावरून वरात काढली होती.वधूचे काका राजेश सोनोने हे वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते असून त्यांची ही संकल्पना आहे. देशाप्रती असलेला आदर, फुले, शाहू, आंबेडकर विचारांचा त्यांच्यावर पगडा असल्याने त्यांनी ती प्रत्यक्ष दोन्ही मुलींच्या लग्नाच्या वेळी अमलात आणली आहे

## मनपा अतिरीक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी घेतला श्वान उत्पत्ती नियंत्रण

### फिशरीज हुब प्रकल्प प्राणी निवारा केंद्राबाबत घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती**


७महानगरपालिका अतिरीक्त आयुक्त शिल्पा नाईक तसेच उपायुक्त (प्रशा) मेघना वासनकर मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली पावसाळ्यापुर्वी करावयाचे नियोजन श्वान उत्पत्ती नियंत्रण उपक्रम २००१ अन्वये श्वानाबाबत करावयाच्या उपाययोजना व निर्बीजीकरण करण्याकरीता चर्चा करण्यात आली तसेच फिशरीज हब प्रकल्पाबाबत केलेल्या आज पर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेण्यात आला तसेच प्राणी निवारा केंद्र व प्राणी कुत्रे यांचे करीता प्रकल्पाबाबत मा. अतिरीक्त आयुक्त चर्चा करण्यात आली. सदर बैठकीत श्वान नियंत्रण उपक्रम २००१ अन्वये श्वानांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या प्रभावी उपाययोजना करावी राज्यातील पाळीव प्राणी इत्यादी प्राण्यांकरीता स्मशानभुमीबाबत चर्चा करुन समन्वय साधावे फिशरीज हब प्रकल्पाबाबत झालेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. प्राणी निवारा केंद्र कोंडेश्वर / राहाटगाव



येथे सुरु असलेल्या प्रकल्पाबाबत कामाचा आढावा घेण्यात आला. लहान व मोठ्या जनावरांच्या शवदाहिनी प्रकल्पाबाबत कामाचा आढावा यावेळी घेण्यात आला. शेणखत, अनधिकृत मटन चिकण व्यवसायाबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अतिरीक्त आयुक्तांनी सदर विषयाचा आढावा घेवुन संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात आले.या बैठकीत उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, पशुशल्यचिकीत्सक डॉ. सचिन बोंद्र, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदिप पाटबागे, उपअभियंता शरद तिनखेडे, अभियंता राजेश आगरकर तसेच प्राणी जन्म नियंत्रण समितीचे डॉ. पाटणे, डॉ. आनंद भरतीया उपस्थित होते.

## महापालिकेत बदल्यांचे महासत्र

### दीपक खडेकर बाजार परवाना विभागाचे सहायक आयुक्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती–**

महापालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जंबो बदल्या करण्यात आल्या आहेत. सहायक अभियंता दीपक खडेकार यांना बाजार व परवाना विभागाच्या सहायक आयुक्तपदी नियुक्त करण्यात आले, तर कनिष्ठ व वरिष्ठ लिपिकांसह सतरा कर्मचाऱ्यांचे विभाग बदलण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभागाने एकाचवेळी तब्बल अठरा जणांच्या बदल्यांचे आदेश काढले आहेत. या बदल्यांमुळे अनेकजण दुखावले असले तरी काहींनी आनंद व्यक्त केला आहे. गेल्या काही वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या वरिष्ठ वकनिष्ठ लिपिकांचे स्थानांतर करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागाने केलेल्या स्थानांतरणांत नगररचना विभागात सहायक अभियंता तथा मालमत्ता अधिकारी दीपक खडेकर यांना बाजार व परवाना विभागात तात्पुरत्या स्वरूपात सहायक आयुक्तपदी नियुक्ती देण्यातआली.

स्थानांतर करण्यात आलेल्या वरिष्ठ लिपिकांमध्ये केशव ठाकरे, शेखर सोनकांबळे, उदय देशमुख, प्रशांत पवार, जितेंद्र श्रीवास्तव, सोनाली चिंचे, उमेश फतवाणी, उदय चव्हाण व अजय बंसेले तर, कनिष्ठ लिपिकांमध्ये विष्णू लांडे, संजय ढोक, सागर अठोर, अजय राठोड, शरद काळे, दिवाकर लकडे, सुनील मसराम व सरीता गेडाम यांचा समावेश आहे.

## मनीषा टाकसाळ यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ प्रदान

### छत्रपती संभाजीनगर येथे भव्य सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** महिला ही समाजाची प्रेरणास्थान असते. आणि ती आपल्या क्षेत्रात जबाबदारीने काम करू लागली तर संपूर्ण समाजामध्ये बदल घडवू शकते. हे वास्तव अधोरेखित करणाऱ्या महिला मनीषा विलास टाकसाळ यांना नुकताच राष्ट्रीय राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ ने नुकताच सन्मान करण्यात आला. संभाजीनगरच्या समग्र सोशल फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित नसून तो एक सशक्त सामाजिक संदेश देणारा ऐतिहासिक क्षण ठरला आहे. राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या विदर्भ प्रदेशाध्यक्ष मनीषा विलास टाकसाळ यांच्या यांच्या सामाजिक स्त्री समक्षीकरण , लेखन, आणि संघर्षमय योगदानाचा यावेळी मोठा सन्मान करण्यात आला. हा सन्मान शिक्षण तज्ञ आणि विधी तज्ञ एड. एस. पी. जवळकर सर यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, उद्योजक, आणि विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने प्रामुख्याने उपस्थित होते. मनीषा टाकसाळ ह्या गेल्या अनेक वर्षापासून रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी, हक्कासाठी,व महिलांच्या सन्मानासाठी रस्त्यावर उतरल्या असून त्यांनी अमरावती, परतवाडा, नागपूर, नाशिक, येथील महिलांना जोडून आपली संघटनेमध्ये एक छबी निर्माण केली आहे. त्यांनी महिलांचे , स्वच्छतागृहाची उपलब्धता,आरक्षण, रेल्वे स्टेशन वरील सुरक्षतेच्या यंत्रणा, तिकीट वाटपात पारदर्शकता त्यासाठी सातत्याने वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलने केली. त्यांनी स्त्री सन्मान, रेल्वे जनजागृती मोहीम, रेल्वे प्रशासनासोबत वारंवार बैठका घेऊन महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. आणि महिला प्रवाशांसाठी हेल्पलाइन सेवा सुरू करून एक समाजासमोर वेगळा आदर्श




निर्माण केला. त्यांनी विविध गावामध्ये बचत गट, आरोग्य जनजागृती, समक्षीकरण शिबिरे, आणि स्वयंपूर्णतेसाठी विविध प्रशिक्षणाद्वारे कार्यक्रम राबवून हजारो महिलांना आपल्या स्वतःच्या पायावर उभे केले. त्यांना राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित केल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १० मे २०२५










## श्रीनगरमध्ये भारतीय लष्कराने पाडली पाकिस्तानची २ फायटर विमानं



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०श्रीनगर–** ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने दहशतवाद्यांवर यशस्वी एअर स्ट्राईक केल्यानंतर पाकिस्ताननेही प्रत्युत्तरादाखल भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला. पंजाब, जम्मू–काश्मीर, राजस्थान आणि गुजरातमधील काही शहरांना लक्ष्य करण्यात आले होते. मात्र, भारतीय लष्कराने सजगतेने पाकिस्तानच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा हवेतच नायनाट केला. पाकिस्तानचा हा हल्ल्याचा डाव पूर्णपणे फसला असून भारताने मजबूत प्रत्युत्तर दिले आहे.श्रीनगरमध्ये पाकिस्तान हवाई दलाची दोन विमानं पाडण्यात आली आहे. भारतीय लष्कराने ही मोठी कारवाई केली आहे. पुन्हा एकदा भारताने पाकिस्तानची दोन विमानं पाडली आहेत. भारत सतत पाकिस्तान च्या प्रत्येक हल्ल्याला करारा जबाब देत आहे चोख प्रत्युत्तर देत आहे. भारतीय सैनाला ही विमानं पाडण्यात मोठं यश आलेलं आहे. भारत पाकिस्तानच्या प्रत्येक शस्त्र, प्रत्येक मिसाईल आणि ड्रोनला हवेतच नष्ट करुन टाकत आहे. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर भारताने जोरदार प्रतिहल्ला केला आहे. भारताने रावळपिंडीतील लष्करी तळ उद्ध्वस्त करत पाकिस्तानच्या १५ मोठ्या शहरांवर हल्ला चढवला. लाहोर आणि कराचीतील एअर डिफेन्स सिस्टिमही भारतीय कारवाईत नष्ट करण्यात आली आहे. या कारवाईने पाकिस्तानची मोठी हानी झाली आहे.

## पाकिस्तानकडून भारताच्या नागरी वस्त्यांवर भ्याड हल्ले; घरांचे नुकसान, काही जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०जम्मू –**पहलगाम हल्ल्यानंतर भारतानेऑपरेशन सिंदूर हाती घेत पाकिस्तानातील दहशतवादी तळांना टार्गेट केले. या हल्ल्याने बिथरलेल्या पाकिस्तानकडून सातत्याने गोळीबार, ड्रोन हल्ले सुरू आहेत. गुरुवारपासून भारतातील सीमाभागातील नागरी वस्त्यांवर पाकिस्तानने भ्याड हल्ले सुरू केलेत. या ड्रोन हल्ल्यामुळे नागरिकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याशिवाय हल्ल्यात काहीजण जखमी झाल्याचीही माहिती आहे. पाकिस्तानने जवळपास ३०० हून अधिक ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. हे सगळे हल्ले भारताच्या एअर डिफेन्स यंत्रणेने परतवून लावले. जम्मू काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात पाकिस्तानने नागरी वस्त्यांवर हल्ले केले. या हल्ल्यातील पीडित जितेंद्र कुमार चड्डा यांनी म्हटलं की, सकाळी ५.४५ मिनिटांनी पाकिस्तानकडून हे हल्ले करण्यात आले. आम्ही घरात झोपलो होतो. त्यावेळी जोरदार आवाज आला. खिडक्यांच्या काचा फुटल्या. भ्याड हल्ला केला जातोय. तो मुस्लीम, हिंदू,



शीख सगळ्यांवर होतो. आमच्या इथं ५ ते ६ जखमी झालेत. आमच्या घरांचे नुकसान झाले. वाहने जळाली असं त्यांनी सांगितले. दरम्यान, सीमेवर पाकिस्तान लष्कराकडून उखळी तोफांचे हल्ले गावांवर केले जात असून, यात आता एका अधिकाऱ्याचा मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी अतिरिक्त आयुक्त राज कुमार थापा यांचा पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती दिली.

## पाकिस्तान जिथून ड्रोन टाकत होता, तेच दहशतवादी लाँच पॅड भारताकडून उद्धवस्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०जम्मू १८**

पहलगाम हल्ल्याचा बदला अखेर भारताने घेतला. भारताने ऑपरेशन सिंदूरअंतर्गत पाकिस्तानात घुसून ९ दहशतवादी तळ उद्धवस्त केले. यामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला. त्यानंतर पाकिस्तानच्या नापाक कारवाया सुरू झाल्या. पाकिस्तान वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे. पाकिस्तान भारताच्या दिशेने वारंवार गोळीबार, ड्रोन हल्ले, क्षेपणास्त्राने हल्ले करत आहे. भारतीय सैन्य देखील या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत आहे. भारताने पाकिस्तानला आणखी एक मोठा धक्का दिला आहे. भारताने पाकिस्तानी चौक्या आणि दहशतवाद्यांचे लाँच पॅड नष्ट केले.

भारतीय लष्कराने जम्मूजवळील पाकिस्तानी चौक्या आणि दहशतवादी लाँच पॅड उद्ध्वस्त केले आहेत. याठिकाणावरून पाकिस्तानकडून ट्यूब लाँच ड्रोन डागले जात होते. संरक्षण सूत्रांचा हवाला देत एएनआय वृत्तसंस्थेने म्हटले आहे की, 'लष्कराच्या या अचूक कारवाईत पाकिस्तानकडून सुरू असलेल्या ड्रोन हल्ल्यांचे मूळ लक्ष्य करण्यात आले. लष्कराने पाकिस्तानी चौक्या आणि दहशतवादी लाँच पॅड नष्ट केले. लष्कराने एक व्हिडिओ देखील जारी केला आहे ज्यामध्ये हे तळ उद्ध्वस्त होताना दिसत आहेत. पाकिस्तानकडून वारंवार होत असलेल्या हल्ल्याला भारताकडून प्रत्युत्तर दिले जात आहे. भारताच्या सैन्यांकडून हवेतच पाकिस्तानचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे पाडले जात आहेत. शुक्रवारी रात्री पाकिस्तानने भारतावर फतेह–२ क्षेपणास्त्र डागले होते. या क्षेपणास्त्राद्वारे पाकिस्तानचा राजधानी दिल्लीवर हल्ला करण्याचा प्रयत्न होता. पण पाकड्यांचे हे क्षेपणास्त्र सैन्यांनी पाडले. हरियाणातील सिरसा येथे हे क्षेपणास्त्र पाडण्यात आले. त्यामुळे मोठा धोका टळला. पाकिस्तानकडून भारतातील सीमेलगतच्या अनेक शहरांवर सतत हल्ले केले जात आहेत. ज्याला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले . जम्मू–श्रीनगर ते पठाणकोट आणि पोखरणपर्यंत पाकिस्तानचे ड्रोन हल्ले केले. शुक्रवारी रात्री पाकिस्तानने भारतावर २६ ठिकाणी ड्रोन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण भारतीय लष्कराने त्यांचे प्रयत्न हाणून पाडले गेले. पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हल्ल्यात जम्मू–काश्मीर, पंजाब, राजस्थानमधील अनेक गावांचे मोठे नुकसान झाले आहे.

## पाकिस्तानला ४.० रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचा हि धक्का

### नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०कराची–** मध्य रात्री १.४४ वाजता ४.० रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचे तीव्र धक्के पाकिस्तानात जाणवले आहेत. याबाबतची माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिली आहे. तसेच या भूकंपाच्या धक्क्यांमुळे लोकांमध्ये घबराट पसरली आहे. मात्र, कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त सध्या तरी समोर आलेलं नाही. या भूकंपाचं केंद्र १० किलोमीटर खोलीवर होतं आणि त्याचं




स्थान २९.६७ अंश उत्तर अक्षांश आणि ६६.१० अंश पूर्व रेखांशावर नोंदवलं गेल्याचं सांगण्यात आलं आहे.

या भूकंपामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान किंवा जीवितहानी झाल्याची माहिती मिळालेली नाही. याआधी सोमवारीही पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या काही भागात ४.२ तीव्रतेचा भूकंप झाला होता. तो भूकंपही १० किलोमीटर खोलीवर होता. दरम्यान, याआधी १२ एप्रिल रोजी पाकिस्तानमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले होते. भूकंपाची तीव्रता ५.८ रिश्टर स्केल एवढी मोजण्यात आली होती.

## आणखी एक घाव! भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या चौक्या आणि दहशतवादी लॉन्चिंग पॅड्स उडवले


**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०रावळपिंडी–** पाकिस्तानकडून ड्रोन्स आणि मिसाईल हल्लूयांची तीव्रता वाढल्यानंतर भारतीय लष्कराने पाकिस्तानवर आणखी एक घाव घातला. आंतरराष्ट्रीय सीमेलगत असलेल्या काही पाकिस्तानी लष्कराच्या चौक्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. त्याचबरोबर ज्या ठिकाणांनी दहशतवाद्यांचे लॉन्चिंग पॅड्स आहेत, तेही उडवण्यात आले. पाकिस्तानकडून हवाई हल्ले वाढल्यानंतर भारतीय लष्करानेही जबरदस्त प्रहार सुरू केला आहे. पाकिस्तान ज्या ठिकाणांवरून भारतातील नागरिक वस्त्यांवर आणि लष्करी ठिकाणांना लक्ष्य केले जात आहे. त्यातील काही चौक्या भारतीय लष्कराने उद्ध्वस्त केल्या आहेत. भारतीय लष्कराकडून एक व्हिडीओ जारी करण्यात आला आहे. हा व्हिडीओ सीमेपलीकडे असलेल्या दहशतवाद्याचे लॉन्चिंग पॅड्स उद्ध्वस्त झाल्याचे आहेत. ज्या ठिकाणावरून भारताविरोधात



हल्ले केले जात आहेत. ती ठिकाणे भारतीय लष्कराने टिपली आहेत. पाकिस्तान ज्या ठिकाणावरून दहशतवाद्यांना भारतात पाठवतो, ते ठिकाणही भारताने उडवले आहे. पाकिस्तानने उधमपूर शहरातील हवाई तळाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर पठाणकोटमध्येही हल्ल्याचा प्रयत्न केला, जो भारतीय लष्कराकडून हाणून पाडण्यात आला. पंजाबमधील ब्रह्मोस मिसाईल स्टोरेज ठिकाणावरही हल्ला केला. पण, हे सगळे हल्ले हवेतच निष्क्रिय करण्यात आले. त्यानंतर पाकिस्तानने दावा केला की, भारताने ६ बॅलेस्टाइन मिसाईल डागल्या आहेत. यात चार हवाईतळावर मोठे स्फोट झाले आहेत. रावळपिंडीतील नूर खा, चक्रवालमधील मुरीद आणि शोरकोटमधील रफीकी या हवाईतळांना लक्ष्य करण्यात आले.

## पाकिस्तानचा बिनडोकपणा उघड, एअर डिफेन्स सिस्टीमने सियालकोटमध्ये स्वत:चाच ड्रोन पाडला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०सियालकोट–** पाकिस्तानचा बिनडोकपणा भारतीय लष्कराने नियंत्रण रेषेजवळ आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानकडून झालेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिलं आहे. पाकिस्तानकडून ८ आणि ९ मे रोजी मोठ्या प्रमाणावर ड्रोन आणि क्षेपणास्त्र डागण्यात आले. मात्र, भारतीय लष्कराने सीमा भागात काउंटर ड्रोन ऑपरेशन सुरू करून पाकिस्तानचे हे प्रयत्न हाणून पाडले आहेत. या कारवाईत भारतीय लष्कराने पाकिस्तानचे अनेक ड्रोन हवेतच नष्ट केले आहेत. तसेच, डागण्यात आलेली क्षेपणास्त्रं देखील हवेतच निष्प्रभ करण्यात आली आहे. यानंतर भारताला घाबरलेल्या पाकिस्तानच्या



एअर डिफेन्स सिस्टीमकडून अंदाधुंद मारा केला जात आहे. आता पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीमने सियालकोटमध्ये स्वत:चाच ड्रोन पाडल्याची माहिती समोर येत आहे.उघड, एअर डिफेन्स सिस्टीमने सियालकोटमध्ये स्वतःचाच ड्रोन पाडला.

तर पाकिस्तानने भारतावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे हल्ला केला, ज्यामध्ये त्यांच्या बहुचर्चित फतेह–१ या क्षेपणास्त्राचाही समावेश होता. या हल्ल्यांनंतर भारतीय सैन्याने ठोस प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. शनिवारी सकाळी भारतीय वायूदलाची लढाऊ विमाने पाकिस्तानच्या हवाई हद्दीत घुसली आणि तीन ते चार प्रमुख हवाई तळांवर तीव्र हल्ले केले. या कारवाईत रावळपिंडीजवळील नूर खान हवाई तळाला भारताच्या लढाऊ विमानांनी लक्ष्य केले. त्यासोबतच, मुरीद आणि सुकूर या हवाई तळांवरही अचूक हल्ले करण्यात आले. या हवाई मोहिमेत पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. भारताच्या हल्ल्यांमुळे घाबरलेल्या पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीमकडून अंदाधुंद गोळीबार सुरू आहे. याच घाईगडबडीत सियालकोटमध्ये पाकिस्तानच्या एअर डिफेन्सने चुकून स्वतःचाच ड्रोन पाडल्याची माहिती समोर येत आहे.

## महाराष्ट्रातील ४ जिल्ह्यात 'ड्रोन'? जिल्ह्यातील प्रशासन अलर्ट मोडवर; राज्यात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०परभणी १९**

परभणीच्या सेलू,गंगाखेड तालुक्यातून आकाशात ड्रोन सदृश वस्तू दिसली आहे. मात्र, गावकऱ्यांमध्ये कुतूहलाचा विषय निर्माण झाला आहे. एकीकडे भारत–पाकिस्तानमध्ये युद्ध सुरु आहे. त्याच अनुषंगाने अनेक ठिकाणी मॉक ड्रिल घेतलं जात आहे. याचदरम्यान परभणीच्या सेलू आणि गंगाखेड तालुक्यातून आकाशात एकाच लाईनमध्ये अनेक ड्रोन सदृश्य वस्तू दिसल्या आहेत. ग्रामीण भागात यामुळे कुतूहलला विषय झालाय. या काही भागात भीतीचं वातावरणही पसरलं आहे.



तसेच बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा परिसरात आज सायंकाळी अनेक वस्तू आकाशातून एका रांगेत जाताना दिसल्या. चकाकणाऱ्या या रांगेत जाणाऱ्या आकाशातील वस्तूंमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. नेमक्या हे काय आहे? याबाबत आता परिसरात चर्चेला उधाण आलं आहे. तिकडे भारत–पाकमध्ये हल्ला हमला सुरु असताना अशा वस्तू आकाशातून जाताना दिसल्यानं नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या कोणत्या वस्तू आकाशातून जात आहे हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

जालना जिल्ह्यातील मंठा, घनसावंगी, परतूर याठिकाणीही ड्रोन सदृश वस्तू दिसल्या आहेत. पोलीस प्रशासनाकडून ड्रोन सदृश वस्तूचा शोध सुरू आहे. जालना जिल्ह्यातील अनेक भागात रात्रीच्या वेळी आकाशात ड्रोन सदृश्य वस्तू दिसल्या आहेत. जालना जिल्ह्यातील मंठा, घनसावंगी आणि परतुरध्ये अनेक गावांमध्ये ड्रोन सदृश्य वस्तू दिसल्यानं नागरिकांमध्ये सध्या भीतीचं वातावरण पाहायला मिळत आहे. दरम्यान, पोलीस प्रशासनाकडून या ड्रोन सदृश्य वस्तूचा शोध सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये तसेच अफवांना बळी पडू नये, असं आवाहन पोलीस अधीक्षकांनी केलं आहे.

## पाकिस्तानकडून हल्ले वाढल्यानंतर भारतीय लष्कराचंही चोख प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०जम्मू–** जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' च्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये ९ ठिकाणी दहशतवादी तळांवर मोठी कारवाई केली. त्या कारवाईनंतर पाकिस्तानची चलबिचल आणखी वाढली असून पाकिस्तान आता भारताच्या दिशेने तथा सीमेवर मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले करत आहे. मात्र, या ड्रोन हल्ल्याला भारतीय लष्करही चोख प्रत्युत्तर देत आहे.

पाकिस्तानने शुक्रवारी (९ मे) रात्री केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना भारतीय लष्कर चोख प्रत्युत्तर देत असल्याची माहिती सरकारी सूत्रांच्यावतीने सांगितली जात आहे.भारतातील विशेषतः जम्मू–काश्मीर आणि पंजाबमध्ये अनेक ठिकाणांना पाकिस्तानकडून लक्ष्य केलं जात आहे. केंद्र सरकार सकाळी १० वाजता पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याबद्दल आणि भारताने दिलेल्या चोख प्रत्युत्तर दिले.

दरम्यान, शनिवारी सकाळी पाकिस्तानने दावा केला की, भारताने इस्लामाबाद जवळील एका हवाई तळासह तीन क्षेपणास्त्रे डागली. मात्र, त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने या हल्याला रोखल्याचं वृत्त रॉयटर्सने दिलं आहे. पाकिस्तानी लष्कराचे प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी रात्री उशिरा दूरदर्शनवर प्रसारित झालेल्या एका निवेदनात म्हटलं की, भारताने विमानांद्वारे हवेतून जमिनीवर क्षेपणास्त्रे डागली.




नूर खान तळ, मुरीद तळ आणि शोरकोट तळांना लक्ष्य केलं, असं निवेदनात म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

जम्मूमध्येही पहाटे ड्रोन हल्ले

जम्मूमध्ये हवाई दलाच्या तळाला लक्ष्य करण्याचा पाकिस्तानी सैन्यांचा प्रयत्न भारतीय जवानांनी हाणून पाडल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. तसेच तेथील स्थानिक रहिवाशांच्या मते पहाटेपर्यंत शहरात अधूनमधून स्फोटांचे आवाज येत होते. दरम्यान, राजौरी शहरावर जोरदार तोफांचा मारा करण्यात आला. ज्यामध्ये मुख्य शहराला लक्ष्य करण्यात आलं होतं. पहाटेच्या सुमारास पठाणकोट शहरात देखील अनेक स्फोटांचे आवाज आले. कमीत कमी अर्धा तास अधूनमधून स्फोटांचे आवाज येत होते. तसेच भारतीय सैन्यांनी देखील जोरदार प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला.

श्रीनगरमध्येही पहाटे ड्रोन हल्ले

जम्मूमधील काही लष्करी छावण्यांसह नागरी वसाहतींनाही लक्ष्य करण्यात आलं. मात्र, नेमकी कोणत्या लष्करी छावण्यांसह नागरी वसाहतींनाही लक्ष्य करण्यात आलं? याची अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पण तरीही जिल्हा प्रशासनाने हाय अलर्टची स्थिती जाहीर केली आहे.

## अमृतसरवरील ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न भारताने उधळला

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१०अमृतसर

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकविरोधात मोठी कारवाई करत ५ धाडसी निर्णय घेतले. त्यात सिंधु जल कराराला स्थगिती देण्यात आली. २२ एप्रिलला झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा जीव गेला होता. त्यामुळे भारत–पाकिस्तान यांच्यात तणाव वाढला होता. दहशतवाद्यांना कुठल्याही किंमतीत सोडणार नाही असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला होता. या हल्ल्याच्या १५ दिवसांनी भारताने ऑपरेशन सिंदुर अंतर्गत पाकिस्तानच्या ९ दहशतवादी ठिकाणांवर एअर स्ट्राईक केला. यात पाकच्या १०० किमी आत जाऊन भारतीय सैन्याने दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त केली.


# एटीएमची सुरक्षा वाऱ्यावर ; केवळ बोटावर मोजण्याइतपत एटीएममध्येच रात्रीचे सुरक्षारक्षक

## सायरण सिस्टिम असल्यास आपत्कालीन परिस्थितीत परिसरातील नागरिक मदतीला येऊ शकतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

पाच दिवसांपूर्वी फरशी स्टॉपस्थित एसबीआयचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न झाला. तर, २५ एप्रिल रोजी राजकमल अंबादेवी रोडस्थित आयडीबीआयचे एटीएम फोडण्यात आले. विशेष म्हणजे ते एटीएम चक्क तिसऱ्यांदा लक्ष्य करण्यात आले. एकाच आठवड्यात झालेल्या दोन घटनांमुळे एटीएमची सुरक्षाव्यवस्था चव्हाट्यावर आली आहे. दोन्ही घटनेत चोरांना कॅश ट्रे लांबविता आला नसला, तरी त्यांनी त्या एटीएमचे मोठे नुकसान केले आहे. त्या दोन्ही एटीएममध्ये रात्रीचा सुरक्षारक्षक नव्हता.

त्या पार्श्वभूमीवर शहरातील काही एटीएमची पाहणी केली असता केवळ दोन खासगी बँकांच्या एटीएममध्ये सुरक्षारक्षक आढळून आले, तर अन्य १३ एटीएममध्ये सुरक्षारक्षक आढळला नाही. त्या सर्व एटीएम केंद्रात अस्वच्छता आढळून आली. सुरक्षारक्षक नसलेले ते एटीएम चोरांसाठी आयती संधी असल्याची प्रतिक्रिया दुकानदारांनी दिली. शहरात विविध बँकांचे सुमारे १६० पेक्षा अधिक एटीएम आहेत. मात्र, ९५ टक्के एटीएममध्ये सुरक्षारक्षक नाहीत, अनेक ठिकाणी सायरन सिस्टिम नाहीत.



### केवळ दोन एटीएममध्ये सुरक्षारक्षक

जयस्तंभ चौक मार्गावरील सिटी युनियन बँक व त्याच मार्गावरील कोटक महिंद्रा बँकेच्या एटीएममध्ये रात्रीच्या वेळी सुरक्षारक्षक आत बसलेले आढळून आले. आपली ड्युटी रात्री ८ ते सकाळी ८ पर्यंत असल्याचे त्यांनी सांगितले. ते दोन एटीएम स्वच्छदेखील आढळले.

### अशी आहेत एटीएमची मानके, अंमल नाहीच

एटीएम सेंटरच्या सुरक्षिततेसाठी काय खबरदारी घ्यावी, याची मानके आरबीआयने ठरवून दिलेली आहे. यामध्ये एटीएम सेंटरमध्ये सायरन, एटीएमच्या बाहेर फ्लॅश लाइट, फक्त रेकॉर्डिंगच्या उद्देशाने कॅमेरे न बसविता आतील आणि बाहेरील अशा दोन्ही भागांचे चित्रीकरण करणारे कॅमेरे असावेत. स्वयंचलित लॉक होणारे दरवाजे तसेच सुरक्षारक्षकांची नेमणूक या मानकांचा समावेश आहे. अनेकदा बँकांचे एटीएम निर्जन स्थळी किंवा रस्त्यापासून काही अंतरावर असतात. त्यामुळे एटीएमला सायरन सिस्टीम बसविणे गरजेचे आहे.

### आयडीबीआय झोपेतच, सुरक्षारक्षक नाहीच

अंबादेवी रोडवरील एका व्यावसायिक संकुलात पहिल्या माळ्यावरील आयडीबीआय बँकेचे एटीएम गेल्या दीड वर्षात आतापर्यंत तब्बल तीनदा फोडले. १७ जानेवारी २०२४ रोजी ते एटीएम फोडण्यात आले. मात्र, १६ लाख रुपये असलेला ट्रे सुरक्षित राहिला. त्यानंतर २ सप्टेंबर २०२४ व २५ एप्रिल २०२५ रोजी देखील ते एटीएम फोडण्यात आले. मात्र, त्या एटीएममधील कॅश चोरण्यात चोर यशस्वी होऊ शकले नाहीत. तब्बल तीनदा एटीएम फोडल्यानंतरही आयडीबीआय बँकेला रात्रीचा सुरक्षारक्षक ठेवण्याचा मुहूर्त मिळालेला नाही. त्यामुळे बँकेला मोठी रक्कम चोरीला जाण्याची प्रतीक्षा तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीचा मार्ग मोकळा

## उच्च न्यायालयाने दिला अंतिम निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या होऊ घातलेल्या ऑनलाईन जिल्हाअंतर्गत बदलीप्रकरणी उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी अंतिम निकाल दिल्याने जिल्हांतर्गत बदलीचा मार्ग मोकळा झाला आहे. या निकालामुळे बदली इच्छुक शिक्षकांना दिलासा मिळाला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांची जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रिया ही ग्रामविकास विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने राबविली जाते. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदली प्रक्रियादेखील ऑनलाईन पद्धतीने राबविली जाते. जे शिक्षक आंतरजिल्हा बदली आपसी बदलीद्वारे आले होते त्यापैकी सेवा कनिष्ठ शिक्षकांची सेवा ही बदलीसाठी ग्राह्य धरावी याकरिता शिक्षकांनी न्यायालयात धाव घेतली होती. या अनुषंगाने आपसी जिल्हा सेवा ज्येष्ठतेसंदर्भात निर्णय घेण्यासाठी न्यायालयाने या जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेला ५ मे पर्यंत स्थगित दिली होती. ५ मे रोजी न्यायालयात यावर सुनावणी होऊन ९ मे रोजी न्यायालयाने अंतिम निकाल दिला आहे. या निर्णयानुसार आंतरजिल्हा बदलीमधील आपसी बदलीद्वारे बदली झालेल्या शिक्षकांपैकी सेवा कनिष्ठ शिक्षकांची सेवा दोन्ही शिक्षकांना बदलीसाठी ग्राह्य धरावी, असा निकाल दिला आहे.






स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायलयाने दिलेले आहेत. त्यामुळे शिक्षकांची ही बदली प्रक्रिया आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी होणे गरजेचे आहे. याकडे प्रशासकीय पातळीवरून विलंब झाला आणि निवडणुकांची आचारसंहिता लागली तर बदली प्रक्रियेमध्ये अडथळा येऊ शकतो.

**राजेश सावरकर, राज्य प्रसिध्दी प्रमुख,**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# जिल्हा परिषदेतील शिलेदारांची दालने ३७ महिन्यांपासून कुलूपबंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि १०अमरावती**

जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या दालनाला मागील ३७ महिन्यांपासून कुलूपबंद आहेत. दालनांचा वापर नसल्याचे त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. त्यामुळे लवकरच प्रशासनाकडून दालनांची डागडुजी सुरू केली जाणार आहे. यावर लाखो रुपये खर्च अपेक्षित आहे. मात्र, जिल्हा परिषदेच्या मार्च महिन्यात पार पडलेल्या अर्थसंकल्पात झेडपी पदाधिकारी यांच्या दालनाच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपयांची तरतूद केलेली नाही. मात्र, जिल्हा सेस निधीचे पुनर्नियोजन करून त्यात आगामी चार महिन्यानंतर मिनी मंत्रालयात येणाऱ्या नव्या शिलेदारांच्या दालनांच्या डागडुजीवर होणार लाखो रुपये खर्च केला जाणार हे मात्र निश्चित आहे.सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे दिवाळीपूर्वी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक होईल. असा अंदाज लावण्यात येत आहे. ग्रामीण भागातील मतदार आपल्या गट, गणातून आपल्या हक्काचा लोकप्रतिनिधी जिल्हा परिषदेत पाठवतील. त्यानंतर झेडपी अध्यक्ष, उपाध्यक्ष व नंतर विषय समित्यांचे सभापती आदीपदाधिकाऱ्यांची निवड होईल. २० मार्च २०२२ पासून जिल्हा परिषदेत ' शिलेदार' नसल्याने त्यांची दालने ही कुलूपबंद होती. यातील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापती यांच्या दालनाचा वापरच नसल्याने कुलूपबंद आहे.




# 'ई-चालान'मधून एप्रिल एंडला ३.०४ कोटी वसूल : ग्रामीण पोलिसांची अनपेड चालान वसुली मोहीम : १३८ जणांविरुद्ध खटले दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

जिल्ह्यामधील वाहनधारकांकडे प्रलंबित असलेल्या ई-चालान दंडाचा भरणा करण्याकरिता अमरावती ग्रामीण पोलिसांकडून १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यादरम्यान मागील ई-चालान अनपेड केसमधील २ कोटी २४ लाख ४३ हजार २०० रुपये व नियमित केसमधून ८० लाख ६ हजार १०० रुपये, असा एकूण ३ कोटी ४ लाख ४९ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच १३८ वाहनधारकांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांकडून वर्ष २०१९ पासून ई-चालानने दंड आकारण्यात आला. मात्र, लाखो वाहनचालकांनी त्या चालानकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे डिसेंबर २०२४ पर्यंत अनपेड चालानची रक्कम तब्बल २५.२३ कोटींवर पोहोचली. त्यामुळे ग्रामीण वाहतूक विभागातर्फे अनपेड दंड वसुलीसाठी विशेष मोहीम राबविली. त्याअंतर्गत ई-चालान दंड प्रलंबित असलेल्या वाहनधारकांना डोअर टू डोअर नोटीस बजावण्यात आल्या. वाहतूक शाखेने जिल्ह्यातील ३१ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महत्वाच्या ठिकाणी व शहरी भागात ही मोहीम यशस्वीपणे राबविली.



ज्या १३८ वाहनधारकांनी प्रलंबित दंडाचा भरणा केला नाही, अशांविरुद्ध न्यायालयात खटले दाखल केले आहेत. न्यायालयाची परवानगी घेऊन वाहन जप्तीची कारवाई करू.

**सतीश पाटील,जिल्हा वाहतूक निरीक्षक**

# तणावाची स्थिती असतांनाच आशा सेविका संपावर जाणार : आरोग्य यंत्रणा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

केंद्र सरकारने डिसेंबरपासूनचा मोबदला दिला नसल्याचे मानधन अडकल्याचे सांगत आशा सेविका व गटप्रवर्तक कर्मचारी २० मे पासून बेमुदत संपावर जाणार आहे. त्याबाबत आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सी. आय. टी. यू.)तर्फे संपाची नोटीस मुख्यमंत्री, आरोग्यमंत्र्यांना दिली आहे. भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धजन्य स्थिती असतांना या संपामुळे आरोग्य व्यवस्थेवर परिणामाचा धोका आहे.


राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या आशा वर्कर व गटप्रवर्तकांना केंद्रशासनाच्या योजनेनुसार काही मोबदला व राज्य शासनातर्फे काही मोबदला मिळतो. राज्य शासनाच्या मोबदला आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना फेब्रुवारी महिन्यापर्यंत मिळाला. परंतु केंद्र सरकारच्या वाट्याचा निधी डिसेंबर महिन्यापासून मिळाला नाही. त्यामुळे हा निधी आशा सेविका व गटप्रवर्तकांना मिळाला नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. या निधीसाठी शासनाला वेळोवेळी निवेदन दिले गेले. परंतु काही झाले वाही. शेवटी ९९ मे पर्यंत हा निधी न मिळाल्यास २० मे पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे नागपूर जिल्हातील अप्पर जिल्हाधिकारी अनूप खांडेतर्फे दिलेल्या निवेदनातून शासनाला कळवल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकातून संघटनेचे राजेंद्र साठे यांनी दिली. यावेळी इतरही मागण्या लावून धरण्यात आल्या. याप्रसंगी राजेंद्र साठे यांच्यासोबतच प्रीती मेश्राम, सुकेशिनी उमरेडकर, अर्चना निर्मळे, अर्चना निमजे, श्वेता मोहाडीकर, प्रभा बोकडे, वंदना पंडित उपस्थित होते.

# सीईओंचे मिशन घरकुल तालुकास्तरावर योजनांच्या आढावांचा सपाटाचार दिवसांत आठ तालुक्यांत बैठका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

पंतप्रधान आवास योजनेतील मंजूर झालेल्या घरकुलांची कामे जलदगतीने व नियोजनबद्ध तसेच लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ तातडीने मिळण्याकरिता सीईओ संजिता महापात्र यांनी या योजनेला प्राधान्य देत आता तालुकास्तरावर बैठकांचा सपाटा सुरू केला आहे. चार दिवसांत नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, अचलपूर, अंजनगाव, दर्यापुर आणि चांदूरबाजार, मोशी, वरूड या आट वालुक्यांचा आढावा घेण्यात आला आह.

जिल्ह्यात ५६ हजारांवर घरकुल मंजूर झाले असून सर्वच लाभाध्यांना पहिल्या हप्त्याचे तर ५० टक्क्यांवर लाभार्थ्यांना दुसरा हप्ता देण्यात आला आहे. अडीच ते तीन हजारांवर घरकुलांची कामेदेखील पूर्ण झाली आहे. ही टक्केवारी वाढविण्याकरिता आता सीईओ रस्त्यावर उतरल्या आहेत. घरकुलांचे हप्ते वितरीत करताना लाभाध्यांना त्रास होऊ नये, मनरेगाच्या मजुरांनाच घरकुलांची कामे मिळावी, घरकुल वेळेवर पूर्ण व्हावी याकरिता आता सीईओ संजिता महापात्र, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख व मनरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत तालुकास्तरावर बैठकांचा सपाटा सुरू केला आहे. एका दिवशी दोन तालुक्यांची संयुक्त बैठक घेतली जात आहे.



तीन दिवसांत सहा तालुक्यांमध्ये या योजनेच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. अचलपूर व अंजनगाव येथे घरकुल योजनांचा आढावा बैठकीदरम्यान सीईओंनी गृहनिर्माण योजना तसेच केंद्र व राज्यस्तरीय घरकुल योजनांचा आढावा घेऊन क्षेत्रीय भेटीचे नियोजन केले होते. अचलपूर व चांदूरबाजार पंचायत समित्यांची बैठक अचलपूर येथील पंचायत समिती सभागृहात, तर दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तालुक्यांची बैठक अंजनगाव सुर्जी येथील पंचायत समिती सभागृहात पार पडली. या बैठकीत मनरेगा आणि घरकुल कामांच्या अभिसरणाचा आढावा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व ग्रामसेवकांकडून घेण्यात आला. बैठकीस प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, गटविकास अधिकारी सुधीर अरबट, नारायण अमझरे, ओकृष्ण खातले, कालीदास तापी, सहायक प्रकल्प अधिकारी चव्हाण व अन्य अधिकारी उपस्थित होते.

# मुदतीपूर्वीच शासकीय ज्वारी खरेदीचे राज्य शासनाचे पोर्टल बंद : ज्वारी उत्पादक शेतकरी संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अचलपूर**

शासकीय ज्वारी खरेदीचे पोर्टल मुदतीपूर्वीच बंद पडले आहेत. अद्यापही ते कार्यान्वित करण्यात न आल्याने ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आह. मात्र या गंभीर समस्येकडे सरकारी यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याचा रोष ज्वारी उत्पादकांमध्ये व्यक्त केला जात आहे.


२२ एप्रिल २५ रोजी राज्य शासनाचे ऑनलाईन पोर्टल सुरू करण्यात आले. तर सदर पोर्टलची मुदत ३० एप्रिल रोजी संपणार होती. मात्र शासकीय अनास्थेमुळे सदर पोर्टल मुदतीपूर्वीच म्हणजे २६ एप्रिल रोजी अचानक बंद पडले. तालुक्यातील १ हजार १५० ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी खरेदी विक्री संस्थेला अर्ज आणि अन्य संबंधित कागदपत्रे ऑनलाइन करण्याकरीता उपलब्ध करून दिली आहे. त्यापैकी २६ एप्रिल पर्यंत केवळ १९२ शेतकऱ्यांचे अर्ज ऑनलाईन करण्यात आले आहे. उर्वरित ९५८ अर्ज अजूनही ऑनलाइन नोंदणीच्या प्रतीक्षेत आहेत. शासकीय ज्वारी खरेदी करण्यासाठी शासकीय ऑनलाईन पोर्टल सुरू झाल्यानंतर अवघ्या ५ दिवसात बंद पडले. ३० एप्रिल पर्यंत सदर पोर्टलची अंतिम तारीख शासनाकडूनच ठरविण्यात आली होती.निर्धारित तारखेच्या आतच सदर पोर्टल बंद करण्यात आल्यामुळे एकट्या अचलपूर तालुक्यातील ९५८ शेतकऱ्यांचे अर्ज नोंदणी अभावी अडगळीत पडले आहे. उल्लेखनीय म्हणजे पोर्टल बंद पडून १३ दिवसाचा कालावधी उलटला आहे, मात्र अद्यापही शासकीय यंत्रणेने अद्यापही पोर्टल सुरू केले नाही.



शेतातून ज्वारीचे पीक शेतकऱ्यांच्या घरी यायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता शासनाने तत्काळ पोर्टल सुरू केले पाहिजे जेणेकरून ऑनलाईन नोंदणी करणे शक्य होईल आणि शेतकऱ्यांच्या ज्वारी खरेदीचे सर्व सोपस्कर पूर्ण करता येईल.

**शुभम लहाने,**
**ज्वारी उत्पादक शेतकरी**

# रक्तसाठा मुबलक ठेवा; आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवर तातडीची बैठक : सचिवांच्या आरोग्य विभागाला सूचना




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०बीड**

'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत भारताकडून पाकिस्तानवर हल्ला चढविला जात आहे. त्याअनुषंगाने लष्कराच्या सर्व दलाच्या सुट्या रद्द केल्या. त्याप्रमाणे आरोग्य विभागालाही सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. डॉक्टर, कर्मचाऱ्यांना सुट्या देऊ नयेत, सुटीवरील अधिकाऱ्यांना कर्तव्यावर हजर होण्यास सांगा. प्रत्येक रक्तपेढीत मुबलक रक्तसाठा उपलब्ध ठेवा, अशा सूचना आरोग्य विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह यांनी आरोग्य विभागातील सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या.

स्ट्रेचर, अभिकर्मक, ऑक्सिजन आणि इतर जीवनरक्षक प्रणालींची तसेच बेडची उपलब्धता सुनिश्चित करावी. फिरते वैद्यकीय पथक सक्षमपणे कार्यान्वित करावे, सर्व आरोग्य किट, अतिरिक्त डिस्पोजेबल वस्तूंसह शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित ठेवावे, प्रयोगशाळा संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित ठेवाव्यात.

आवश्यकतेप्रमाणे मॉक ड्रिल घेण्यात यावे. ब्लॅक आऊट झाल्यास आरोग्य संस्थेची आपत्कालीन सेवा चालू राहतील. मात्र, ब्लॅक आऊट पाळण्यासंबंधी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाप्रमाणे उचित कार्यवाही करावी, असे निर्देशही दिले आहेत.

शुक्रवारी आरोग्य सचिव वीरेंद्र सिंह यांनी ऑनलाइन बैठक घेतली. यात लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह संचालक, उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता, जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

### औषधांचीही कमतरता भासू देऊ नका

रक्तसाठ्याबरोबरच सर्वच संस्थांमध्ये औषधी मुबलक ठेवा. ऑक्सिजन, व्हेंटिलेटरसह आयसीयू कक्ष सज्ज ठेवा. राष्ट्रीय आरोग्य अभियान, आयुषसह इतर सर्व विभागांनाही सतर्क राहण्याच्या सूचना सचिवांनी दिल्या आहेत.

### सचिवांनी काढले परिपत्रक

शासनाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांनीही सायंकाळच्या सुमारास परिपत्रक काढून काही सूचना केल्या. यात सर्व आरोग्य संस्था या पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवाव्यात, सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी कर्तव्यावर हजर असावेत, रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहने सर्व आवश्यक जीवनरक्षक प्रणालींसह उपलब्ध असावीत.

# दहावीच्या निकालाची वाट पाहणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी

## यावर्षी अकरावीची सर्व प्रक्रिया ऑनलाइन पार पडणार Mahafyjcadmissions.in हेच शासनाचे अधिकृत संकेतस्थळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

बारावीच्या निकालानंतर सर्वांच्या नजरा दहावीच्या निकालाकडे लागल्या आहेत. निकालाच्या तारखेसंदर्भात महाराष्ट्र बोर्डाकडून अद्याप कोणतीही अपडेट दिलेली नाही, पण दोन आठवड्यात दहावीचा निकाल लागण्याची शक्यता आहे. पण त्याआधी महाराष्ट्र बोर्डाकडून महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे. दहावीमध्ये पास होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आणि



त्यांच्या पालकांसाठी ही बातमी महत्त्वाची आहे. अकरावीच्या निकालासंदर्भात बोर्डाने मोठा निर्णय घेतला आहे.

दहावीमध्ये पास झाल्यानंतर अकरावीत प्रवेश घेण्यासाठी लगबग सुरू होते. वेळेवर पाल्य आणि पालकांची गैरसोय होऊ नये म्हणून बोर्डाकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. अकरावीसाठीचा प्रवेश ऑनलाईन होणार आहे, बोर्डाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी करत माहिती देण्यात आली आहे. दहावीची परीक्षा देणाऱ्या प्रत्येकाच्या नजरा सध्या निकालाकडे लागल्या आहेत. सध्या प्रत्येकजण कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा याचा विचार करत आहे, त्या पार्श्वभूमीवर ही महत्त्वाची बातमी समजली जात आहे.

अकरावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी बोर्डाकडून महत्त्वाचा माहिती देण्यात आली आहे. यंदा इयत्ता अकरावीची सर्व प्रक्रिया ऑनलाइन पार पडणार आहे. अनधिकृत वेबसाईट वरून येणाऱ्या जाहिरातींवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन महाराष्ट्र बोर्ड प्रशासनाने विद्यार्थ्यांना आणि पालकांना केले आहे.

बोर्डाने याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी केलेय. त्यांनी आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलेय की, पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी अनधिकृत संकेतस्थळावरून प्रसारित होणाऱ्या जाहिरातींवर विश्वास ठेऊन प्रवेश घेऊ नये. शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरून प्रसिद्ध होणारी माहिती हीच अधिकृत माहिती आहे. Mahafyjcadmissions.in हे शासनाचे अधिकृत संकेतस्थळ आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे अकरावीसाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकांनी फक्त अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा.

## जिल्हा परिषदेच्या 'रील' स्पर्धेला आता ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

स्वच्छ व सुजल गावावर आधारित रील स्पर्धेसाठी जिल्हा परिषदेने ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे इच्छुक स्पर्धक या काळात आपल्या प्रवेशिका सादर करू शकतात. या स्पर्धेची मूळ संकल्पना केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयातील पेयजल व स्वच्छता विभागाची आहे. या स्पर्धेसाठी आधी मे महिन्यापर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु आता ती तारीख थेट ३१ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. इच्छुक युवक-युवतींनी आपल्या गावाची स्वच्छता व पाण्यासाठीची आत्मनिर्भरता स्पष्ट होईल, अशी माहिती या रीलमध्ये अपेक्षित आहे. देशभरातून प्राप्त रोलमधून उत्कृष्ट ५ रील निवडण्यात येणार असून संबंधिताना योग्य बक्षिसेही देण्यात येणार आहेत.

# काळजी नको, संपूर्ण देशात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा अखंड साठा उपलब्ध, कंपनीकडून मोठे अपडेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० मुंबई**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाचं वातावरण आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्याचं पाकिस्तानी कनेक्शन उघड झाले. त्यानंतर भारतानं जोरदार उत्तर दिलं. भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तानचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. त्याचं ड्रोन हल्ल्यानं उत्तर देण्याचा प्रयत्न पाकिस्ताननं केला. पण, तो प्रयत्न भारतानं निष्फळ ठरवला. दोन्ही देशातील तणावाच्या पार्श्वभूमीचा देशातील इंधन पुरवठ्यावर काय परिणाम होणार याची चिंता अनेकांना सतावत होती. पण, काळजी करण्याचे कारण कोणतेही कारण नाही. देशात इंधन पुरवठा करणाऱ्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडनं




(बीपीसीएल) याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

आमच्या विशाल देशव्यापी नेटवर्कमध्ये पुरेसे पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजी साठा उपलब्ध असल्याची माहिती बीपीसीएलनं दिली आहे. आमच्या देशव्यापी नेटवर्कमधील सर्व बीपीसीएल इंधन केंद्रे आणि एलपीजी वितरक सुरळीतपणे कार्यरत आहेत आणि ग्राहकांच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पूर्णपणे सुसज्ज आहेत.

नागरिकांनी काळजी करण्याचे किंवा घाबरून तातडीने आवश्यक खरेदी करण्याचे कोणतेही कारण नाही. आमचे पुरवठा साखळी ऑपरेशन्स मजबूत आणि कार्यक्षम आहेत, ज्यामुळे अखंड पुरवठा सुरु आहे. बीपीसीएल ऊर्जा सुलभता आणि विश्वासार्हतेसाठी त्यांच्या वचनबद्धतेवर दृढ असून आम्ही सर्व ग्राहकांना शांत राहण्याचे आवाहन करतो, असं कंपनीनं सांगितलं आहे.

# रिद्धपुरात मराठी भाषा विद्यापीठाचा श्रीगणेशा, २०२५-२६ सत्रासाठी प्रवेश जूनमध्ये सुरू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मराठी भाषा विद्यापीठाची कित्येक वर्षांची प्रतीक्षा आता संपली असून मराठीचे आद्यकर्ते संत आणि समतेचा विचार सर्वप्रथम तेराव्या शतकात मांडणारे गोविंदप्रभू आणि महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूर येथील 'थीम पार्क'मध्ये हे विद्यापीठ सुरू झाले आहे. येत्या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी दिली.

मराठी भाषा विद्यापीठात चार प्रशालांच्या माध्यमातून



विविध अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत. या प्रशालांसाठी अभ्यास मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. अभ्यास मंडळांच्या एकत्रित बैठकीनंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार लवकरच अभ्यासक्रमांची संरचना तयार केली जाणार आहे. विद्यापीठाच्या कामकाजासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून ही सर्व प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. विद्यापीठाचे स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात येत आहे. त्यावर प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात येईल आणि जून-जुलैमध्ये यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून प्रवेश सुरू होतील, असे डॉ. अविनाश आवलगावकर यांनी सांगितले.

मराठी भाषा विद्यापीठात देशातील व परदेशातील साहित्याचे अनुवाद करून त्यांच्या भाषांमधील दर्जेदार साहित्याचा अनुभव घेता येईल. लोककला, लोकसाहित्य, बोलीभाषांचा अभ्यास, प्राचीन ज्ञानाचे संशोधन आदी उपक्रम राबविण्यास आणि मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी त्याचा उपयोग होईल. ज्या मराठी तरूणांना इंग्रजीतून शिक्षण घेण्याची संधी आर्थिक किंवा इतर अडचणींमुळे मिळू शकली नाही, त्यांना आपल्या मायमराठीतून शिक्षण मिळू शकेल, असे डॉ. आवलगावकर यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव केशव तुपे, प्रशासकीय अधिकारी राम राठोड उपस्थित होते.

रिद्धपूर हे महानुभाव पंथाचे प्रमुख केंद्र आहे. या भूमीत दुर्मिळ अशी ग्रंथसंपदा आणि हस्तलिखिते अजूनही संग्रही आहेत. त्यांचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातून अभ्यासक येतात. या ठिकाणी मराठी भाषा विद्यापीठ सुरू होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे, असे कविश्वर कुळाचार्य महंत मोहनदादा कारंजेकर यांनी सांगितले.

**असे आहेत अभ्यासक्रम**

विद्यापीठात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसोबतच विविध व्यवसायाभिमूख अभ्यासक्रमही शिकवले जाणार आहेत. मराठी भाषाशास्त्र व लिपीशास्त्र, मराठी भाषा अभियांत्रिकी व संगणकीय भाषाशास्त्र, मराठी समाजभाषा विज्ञान व बोलीविज्ञान, भारतीय व विदेशी भाषा, मराठी अनुवादशास्त्र हे अभ्यासक्रम आहेत. फाईन न्ड परफॉर्मिंग आर्ट, संगीत आणि नृत्य, मराठी अभिजात भाषा, माध्यम लेखन, प्रमाणपत्र मराठी व प्रशासकीय लेखन, लेखन कौशल्य तसेच सामाजिक विज्ञान, पत्रकारिता व जनसंज्ञापन.

# महाराष्ट्रात मान्सून ४ ते ६ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता : आला रे आला मान्सून आला! केरळमध्ये वेळेआधीच धडकणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

उकाड्याने त्रस्त झालेल्यांना दिलासादायक माहिती हाती आली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सून पाच दिवस आधीच केरळात धडकण्याची शक्यता आहे. केरळात मान्सून २७ मेपर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सूनचं केरळात साधारणपणे १ जूनपर्यंत आगमन होतं. आयएमडीच्या आकडेवारीनुसार, मान्सून अपेक्षेआधी केरळात धडकला, तर २००९ सालानंतर दुसऱ्यांदा मान्सून भारतात वेळेआधी धडकणार आहे. २००९ साली पावसाचं आगमन २३ मे रोजी झालं होतं.

मान्सून केरळ राज्यात साधारणपणे १ जूनपर्यंत धडकतो. ८ जुलैनंतर संपूर्ण भारत देशात पावसाला सुरुवात होते. १७ सप्टेंबरनंतर उत्तर-पश्चिम भारतातून पाऊस परतण्यास सुरुवात होते. पाऊस १५ ऑक्टोबरनंतर पूर्णपणे परततो. आयएमडीने एप्रिलमध्ये २०२५ च्या मान्सूनसाठी एकूण सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवला होता. तर भारताच्या उपखंडात सरासरीपेक्षा कमी पावसाशी संबंधित एल निनो परिस्थितीची शक्यता नाकारली होती.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी म्हटलं की, 'भारतात किमान चार महिने (जून ते सप्टेंबर) सामान्य स्वरुपात पावसाची शक्यता असते. यंदा मान्सूनचं आगमन होण्याआधीच अवकाळी पावसाने कहर केल्याचं पाहायला मिळालं. मागील काही आठवड्यात वादळी वाऱ्यांसह अवकाळी पाऊस पाहायला मिळाला. या पावसामुळे दिल्लीसहित काही भागात वातावरणात गारवा निर्माण झाला. मागील पाच दिवसांत उत्तर प्रदेश, बिहार, हरियाणा आणि पंजाबच्या विविध भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली.

केरळात पाऊस दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात साधारण ७ जूनपर्यंत आगमन होते. हवामान विभागाच्या दाव्यानुसार, मान्सून तीन दिवस आधीच केरळात दाखल झाला, तर महाराष्ट्रात देखील मान्सून लवकरच येण्याची मोठी शक्यता आहे. महाराष्ट्रात मान्सून ४ ते ६ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# नागपूरनिर्मित 'पिनाका' भारत-पाक सीमेवर ; पोखरणमध्ये अलीकडेच सराव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर**

भारतीय सैन्याने राजस्थानमधील पोखरणमध्ये स्वदेशी बनावटीच्या पिनाका क्षेपणास्त्राचा अलीकडेच सराव केला होता. ते आता पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्यासाठी सीमेवर सज्ज करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान मध्ये वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर शस्त्रसज्जता करण्यात आली आहे. पिनाका क्षेपणास्त्र



संपूर्णत: भारतीय बनावटीचे असून प्रचंड शक्तिशाली आहे. त्याची निर्मिती संरक्षण संशोधन व विकास संघटनेने (डीआरडीओ) केली असून प्रारंभी नागपूर आणि विदर्भातील आयुध निर्माणीत त्याचे उत्पादन झाले. आता त्याला मोठी मागणी आहे. त्यामुळे सोलर एक्सप्लोसिव्ह कंपनीला देखील उत्पादन करण्याचे काम देण्यात आले आहे.

पिनाका क्षेपणास्त्रात केवळ ४४ सेकंदात ७२ रॉकेट लॉन्च करण्याची क्षमता आहे. तसेच ६० ते ९० किलोमीटरपर्यंत मारा करता येतो. शिवाय अचूक लक्ष्य टिपले जाऊ शकते. हे क्षेपणास्त्र भारताच्या आत्मनिर्भर भारत उपक्रमाचा भाग आहे. भारताकडे वार्षिक ५ हजारपेक्षा अधिक क्षेपणास्त्र निर्मितीची क्षमता आहे. त्यामुळे अधिक काळ चालणाऱ्या युद्धासाठी त्यांची उपलब्धता होऊ शकते. सध्या सुरू असलेल्या युद्धातही पिनाकाचा वापर केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे एका निवृत्त अधिकाऱ्याने सांगितले.

**शत्रूला धडकी भरवण्यासाठी सराव**

पिनाका क्षेपणास्त्राच्या वेगवेळया आवृत्त्या तयार आहेत. नवीन आवृत्ती ९० किलोमीटरपर्यंचे लक्ष्य गाठू शकते. एकाचवेळी अनेक रॉकेट सोडता येतात. युद्धाच्यावेळी लक्ष्यावर हल्लाबोल करणे हे या क्षेपणास्त्राचे प्रमुख काम आहे. 'ऑपरेशन सिंदूर'पूर्वी पाकिस्तानाविरुद्ध भारताची तयारी दर्शवण्यासाठी त्याचा सराव करण्यात आला, असे सूत्रांनी सांगितले.

